बुधवार, 27 जुलै 2022
⊙ किमत 5 रुपये | औरंगाबाद (महाराष्ट्र)
⊙ मराठी ⊙ दैनिक
⊙ वर्ष - 02 ⊙ अंक - 04
Title Code : MAHMAR51117


# आधुनिक केसरी

● MARATHI ● DAINIK ● AURANGABAD (MAHARASHTRA) ● WEDNESDAY 27 JULY 2022 adhunikkesari.com Adhunik Kesari ● YEAR-02 ● ISSUE-04 ● TITLE CODE : MAHMAR51117 ● PAGE-10 ● PRICE-5


# अण्णाभाऊ आणि मार्क्सवाद

आधुनिक केसरी

कॉम्रेड अण्णाभाऊ साठे आयुष्यभर मार्क्सवादीच म्हणूनच राहिले. मार्क्सवादी असताना भारतीय वर्णव्यवस्था, जातीव्यवस्थेचे दर्शन अण्णाभाऊंना अगदीच जवळून झाले. जातीव्यवस्था आणि वर्ण व्यवस्थेला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे शेवटपर्यंत लढा दिला. त्या लढ्याने अण्णाभाऊ प्रभावित झाले होते. बाबासाहेब आणि अण्णाभाऊ यांचे विचार जरी वेगवेगळे असले तरी एका ठराविक स्तरावर आण्णाभाऊ बाबासाहेबांच्या विचारला मानत होते हे लक्षात घेणे आवश्यक आहे. म्हणून आंबेडकरवाद आणि मार्क्सवाद याचा संगम म्हणून मी अण्णाभाऊंच्या साहित्याकडे पाहतो. अण्णाभाऊंच्या साहित्यावर मॅकझीम गॉरकीचा प्रभाव राहतो हे मान्यच करावे लागते.



आंबेडकरवाद आणि मार्क्सवाद हे दोन्ही एकत्र झाले की भारतातील श्रमिक, दलित कामगार कष्टकरी, बहुजन यांच्या जीवन मरण्याचे विचार आंबेडकरवाद आणि मार्क्सवादातून मिळत असतात. आणि हे दोन्ही विचार भारताच्या अखंडतेला तारणारे आहेत असे मी मानतो. परंतु व्यवस्थेकडून हे होऊ दिले जात नाही. त्यात या ना त्या प्रकारे खोडा घालीत धार्मिक व जातीय रंग देण्याचे काम केले जाते. ते न पटणारे आहे. त्यासाठी बाबासाहेबांनी आणि अण्णाभाऊंनी उभारलेल्या लढ्यांचा चिकित्सक अभ्यास लक्षात घ्यावा लागेल. त्या दोघांच्याही किमान आणि समान विचारांनी आपण सोबत चाललो तर चळवळीला यश मिळेल. नसता प्रत्येकाने वेगवेगळ्या वाटा निवडल्या तर त्यात आपला विनाश अटळ असे माझे मत आहे.




अण्णाभाऊ 1931 ला मुंबईत गेल्यावर माटुंगातील लेबर कॉलनीत मार्क्सवादी पुढाऱ्यांच्या नेतृत्वाखाली अण्णाभाऊंची जडणघडण होते. त्यांच्या सानिध्यात राहून अण्णाभाऊंना वर्गीय लढा, मार्क्सवाद हे काय आहे हे कळते आणि तेथूनच ताऊन सुलाखून निघत अण्णाभाऊ मार्क्सवादी विचाराने प्रेरित होतात. आण्णाभाऊ आपल्या लढायला सुरुवात करतात. पुढे बाबासाहेब 1933 ला स्वतंत्र मजूर पक्षाची स्थापना करतात आणि त्याचवेळी अण्णाभाऊ योगायोगाने कम्युनिस्ट पक्षाचे सदस्य होतात हा इतिहास आहे. म्हणून अण्णाभाऊ आयुष्यभर मार्क्सवादी, कम्युनिस्टच राहिले. त्यांची कम्युनिस्टची नाळ तोडणे म्हणजे त्यांच्या विचाराला खो दिल्यासारखे होईल. बाबासाहेबांच्या कार्याचा अण्णाभाऊंच्या विचारावर प्रभाव झालेला होता हे मान्यच करावे लागते. परंतु अण्णाभाऊंच्या कार्याची समाजाने दखल घेतली नसल्यामुळे तो उपेक्षित राहिले असे दुर्दैवाने म्हणावे लागते. आणि अण्णाभाऊ हे कम्युनिस्ट नव्हते हे व्यवस्थेने जाणीवपूर्वक आपल्यावर लादले आहे लक्षात घेणे आवश्यक आहे. असे असतानाही अण्णाभाऊ पहिल्या दलित साहित्य संमेलनाचे अध्यक्ष होतात. तेव्हा व्यासपीठावरून आपली खंबीर भूमिका ते मांडतात तेही विचारात घेणे आवश्यक आहे. अण्णाभाऊ जेव्हा 1949 ला इपटाचे अध्यक्ष होते. तेव्हा त्यांनी कामगारांसाठी दिलेला लढा सर्वज्ञात आहे. अण्णाभाऊ शेवटपर्यंत मार्क्सवादीच होते त्यांची भूमिका साम्यवादी विचाराची होती. अण्णाभाऊंच्या विचारांची चिकित्सा होत असताना अण्णाभाऊंच्या साहित्यातून मार्क्सवाद प्रतिबिंबित होतो. म्हणूनच... ' जग बदल घालुनी घाव सांगून गेले मला भीमराव...' असे अण्णाभाऊ सांगतात. हे लक्षात घेणे या प्रसंगी खूप आवश्यक वाटते.

**(शब्दांकन- बाळासाहेब जोगदंड औरंगाबाद)**

# १९ खासदार निलंबित

## महागाई, 'जीएसटी'वरून विरोधक आक्रमक, राज्यसभेत गोंधळ

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली : लोकसभेतील काँग्रेसच्या चार खासदारांच्या निलंबनापाठोपाठ राज्यसभेतील विरोधी पक्षांच्या १९ खासदारांना मंगळवारी आठवडाभरासाठी निलंबित करण्यात आले. कामकाजात सातत्याने अडथळे आणल्याचे कारण देत ही कारवाई करण्यात आली.**

गेल्या आठवडयापासून विरोधी पक्षांचे खासदार लोकसभेत आणि राज्यसभेत इंधन दरवाढ, महागाई, जीएसटी, अग्निपथ योजना आदी मुद्द्यांवर सभागृहांमध्ये चर्चा करण्याची मागणी करत आहेत. मात्र, केंद्र सरकारने ही मागणी मान्य न केल्यामुळे विरोधक सभागृहांमध्ये निदर्शने करत आहेत. त्यामुळे दोन्ही सभागृहांचे कामकाज सातत्याने तहकूब होत आहे. लोकसभेत सोमवारी झालेल्या गोंधळानंतर काँग्रेसच्या चार खासदारांना उर्वरित पावसाळी अधिवेशनासाठी निलंबित करण्यात आले होते. राज्यसभेतही सोमवारी विरोधकांनी गोंधळ घातला होता आणि पीठासीन अधिकारी विरोधी खासदारांना शांत बसण्यास सांगत होते. अखेर गोंधळ घालणाऱ्या खासदारांवर कारवाई करण्यात आली.

सुष्मिता देव, मौसम नूर, शांता छेत्री, डोला सेन, शंतनू सेन, अधीररंजन बिश्वास आणि नदिमूल हक (तृणमूल काँग्रेस), महम्मद अब्दुल्ला, एस. कल्याण सुंदरम, आर गीररंजन, एन.



आर. एलांगो, एम. शण्मुगम, के. सोमू (द्रमुक), बी. लिंगय्या यादव, रवी वड्डीराजू, दामोदर दिवाकोंडा (टीआरएस), ए. ए. रहीम, व्ही. शिवदासन (माकप), पी. संतोष कुमार (भाकप) या १९ खासदारांचे निलंबन करण्यात आले. हे सर्व खासदार महागाई, जीएसटी या मुद्द्यांवर राज्यसभेत तातडीने चर्चा करण्याची मागणी करत होते. निलंबित खासदार सभापतींसमोरील मोकळ्या जागेत येऊन घोषणाबाजी करत होते.

### सर्वाधिक सदस्य तृणमूलचे

निलंबित खासदारांमध्ये तृणमूल काँग्रेसचे सात आणि द्रमुकचे सहा, तेलंगण राष्ट्र समितीचे (टीआरएस) तीन, मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे दोन आणि भारतीय कम्युनिस्ट पक्षाच्या (सीपीआय) एका खासदाराचा समावेश आहे. सभागृहाच्या कामकाजात अडथळा आणू नका, या विनंतीकडे पूर्णतः दुर्लक्ष केल्यामुळे खासदारांविरोधात कारवाई करण्यात आली असल्याचे उपसभापती हरिवंश यांनी सांगितले.

# फुकटेगिरीवर नियंत्रणासाठी वित्त आयोगाशी चर्चा करा!

## सर्वोच्च न्यायालयाची केंद्र सरकारला सूचना

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** राजकीय पक्ष करदात्यांच्या पैशातून देत असलेल्या मोफत लाभांच्या योजनांना आळा घालण्यासाठी राज्यांना दिल्या जाणाऱ्या आर्थिक निधीवर नियंत्रण ठेवता येईल काय, याबाबत केंद्र सरकारने वित्त आयोगाशी चर्चा करावी, अशी सूचना सर्वोच्च न्यायालयाने मंगळवारी केली.

राजकीय पक्षांकडून जाहीर केल्या जाणाऱ्या अशा मोफत लाभाच्या योजनांवर नियंत्रण ठेवण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाने निर्देश द्यावेत, अशी याचिका दाखल करण्यात आली आहे. या याचिकेवर भूमिका स्पष्ट करण्यात केंद्र सरकार कचरत का आहे, अशी विचारणाही यावेळी न्यायालयाने केली. सरन्यायाधीश एन. व्ही. रमणा यांच्या नेतृत्वाखालील त्रिसदस्यीय पीठापुढे या याचिकेवर सुनावणी सुरू आहे. मोफत वाटपाच्या घोषणांमुळे सरकारच्या तिजोरीवर अत्यधिक ताण पडत आहे. त्यामुळे अशा योजना थांबविण्यात याव्यात, अशी मागणी याचिकादारांनी केली आहे. या प्रश्नावर काय तोडगा काढावा, याबाबत वित्त आयोगच योग्य सल्ला देऊ शकतो, असे सुनावणीदरम्यान ज्येष्ठ विधिज्ञ कपिल सिब्बल यांनी निदर्शनास आणले. त्यानंतर सरन्यायाधीश रमणा यांनी अतिरिक्त सॉलिसिटर जनरल के. एम. नटराज यांना निर्देश दिले की, याबाबत वित्त आयोगाचे म्हणणे काय आहे, ते जाणून घ्यावे.

सरन्यायाधीशांसह न्या. कृष्णमुरारी आणि न्या. हिमा कोहली यांचा समावेश असलेल्या या पीठाने सांगितले की, कोणतेही तारतम्य नसलेल्या मोफत लाभाच्या योजना जाहीर करण्यापासून आम्ही राजकीय पक्षांना थांबवू शकतो किंवा नाही, किंवा किती मर्यादेपर्यंत न्यायालय यात हस्तक्षेप करू शकते, हे आम्ही आधी तपासून पाहू. या वादाच्या विषयावर किमान चर्चेला तोंड फोडण्यासाठी कोणत्या प्राधिकाऱ्यांना जाब विचारता येईल, हे सॉलिसिटर जनरल यांनी न्यायालयास कळवावे. ही याचिका पुढील आठवडयात सुनावणीस घेता येईल काय, हे पाहू, असेही सरन्यायाधीश म्हणाले.

# काँग्रेसचे शक्तिप्रदर्शन ; सोनिया गांधींची 'ईडी'कडून चौकशी

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** 'नॅशनल हेराल्ड'प्रकरणी काँग्रेस अध्यक्ष सोनिया गांधी यांची सक्तवसुली संचालनालयाने (ईडी) मंगळवारीही चौकशी केली. सोनिया यांची 'ईडी'च्या कार्यालयात चौकशी सुरू असताना काँग्रेसने संसद भवनाशेजारच्या विजय चौकात ठिय्या आंदोलन केले. या शक्तिप्रदर्शनादरम्यान काँग्रेसचे माजी अध्यक्ष राहुल गांधी यांच्यासह पक्षाचे वरिष्ठ नेते, खासदार आणि कार्यकर्त्यांना पोलिसांनी ताब्यात घेतले आणि सायंकाळी त्यांची सुटका केली.

राष्ट्रपती भवन, नॉर्थ ब्लॉक, साऊथ ब्लॉक, संसद भवन अशा सुरक्षेच्या दृष्टीने संवेदनशील भागात राजपथावर असलेल्या विजय चौकात काँग्रेसचे नेते, संसदेच्या दोन्ही सभागृहांतील खासदार आणि कार्यकर्त्यांनी मंगळवारी सकाळी ठिय्या आंदोलन केले. 'ईडी'च्या चौकशीविरोधात सोनिया गांधी यांना पाठिंबा देण्याबरोबरच काँग्रेसच्या नेत्यांनी इंधन दरवाढ, महागाई, जीएसटी, बेरोजगारी या मुद्द्यांवर संसदेमध्ये चर्चा होत नसल्याचा आरोप करत केंद्र सरकारविरोधी निदर्शने केली. राष्ट्रपती भवनावर मोर्चा काढण्याचा त्यांचा मानस होता. त्यामुळे त्यांना पोलिसांनी ताब्यात घेतले. विजय चौकाप्रमाणे काँग्रेसच्या मुख्यालयात जमलेल्या शेकडो कार्यकर्त्यांनी निदर्शने केल्यानंतर त्यांनीही पोलिसांनी ताब्यात घेतले. अनेक ठिकाणी कार्यकर्ते आणि पोलीस यांच्यात संघर्ष उडाला.

सोनिया गांधी यांना 'ईडी'च्या कार्यालयात पोहोचवून राहुल गांधीही काँग्रेसच्या आंदोलनात सहभागी झाले. सर्व नेत्यांना ताब्यात घेतल्यानंतर विजय चौकात एकटे राहुल गांधी रस्त्यावर ठाण मांडून बसले होते. त्यांच्याभोवती पोलिसांचा गराडा होता. सुमारे ३०-३५ मिनिटांनंतर पोलिसांनी राहुल गांधी यांना ताब्यात घेण्याचा निर्णय घेतला. राज्यसभेचे विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खरगे, लोकसभेतील काँग्रेसचे गटनेते अधीर रंजन चौधरी, काँग्रेसचे महासचिव के. सी. वेणुगोपाल, सचिन पायलट, मनीष तिवारी यांच्यासह लोकसभेतील तसेच, राज्यसभेतील ५० काँग्रेस खासदार आणि राहुल गांधी यांना किंग्जवे कॅम्प पोलीस ठाण्यात नेण्यात आले. तिथे त्यांनी 'चर्चासत्र' भरवून देशाच्या सुरक्षेपासून महागाईपर्यंत अनेक विषयांवर चर्चा केली. दरम्यान, काँग्रेसने राहुल यांच्या ठिय्या आंदोलनाची तुलना माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्याशी करणारे छायाचित्र ट्वीट करून इतिहासाची पुनरावृती होत असल्याचा दावा केला.

काँग्रेस कार्यकर्त्यांना आंदोलन करण्यासाठी राजघाटावरही जाऊ दिले गेले नाही, असा आरोप महासचिव अजय माकन यांनी केला. त्यावर, काँग्रेसचा 'सत्याग्रह' हे निव्वळ नाटक असून, काँग्रेसकडे आता मुद्दे राहिलेले नसल्याची टीका भाजपचे प्रवक्ते संबित पात्रा यांनी केली.

'नॅशनल हेराल्ड' प्रकरणी २१ जुलै रोजी सोनिया यांची 'ईडी'कडून अडीच तास चौकशी झाली होती. मंगळवारीही सोनियांची सहा तास चौकशी करण्यात आली. त्यांना आज, बुधवारीही चौकशीसाठी बोलावण्यात आले आहे. याआधी याच प्रकरणात राहुल गांधी यांची 'ईडी'ने पाच दिवस सुमारे ५० तास चौकशी केली होती.

# श्रीलंकेत स्थैर्यासाठी भारताचा पाठिंबा

आधुनिक केसरी न्यूज



**कोलंबो :** भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी श्रीलंकेचे नवनिर्वाचित राष्ट्राध्यक्ष रानिल विक्रमसिंघे यांचे या पदावरील निवडीबद्दल अभिनंदन केले. श्रीलंकेत स्थैर्य, आर्थिक सुधारणा करण्यासाठी श्रीलंकावासीयांच्या लोकशाही मार्गांनी सुरू असलेल्या प्रयत्नांना भारताचा कायम पाठिंबा राहील, अशी ग्वाही त्यांनी दिली आहे. कोलंबोतील भारतीय दूतावासाने एका ट्वीटद्वारे सांगितले, की पंतप्रधान नरेंद्र मोदींनी श्रीलंकेचे अध्यक्ष रानिल विक्रमसिंघे यांच्या निवडीबद्दल पत्र पाठवून त्यांचे अभिनंदन केले.

दूतावासातर्फे सांगण्यात आले, की भारत-श्रीलंकेदरम्यान शतकांपासून असलेल्या पुरातन घनिष्ठ मैत्रीचे संबंध दृढ करण्यासाठी व उभय देशांच्या नागरिकांच्या हितसंवर्धनासाठी श्रीलंकेच्या नवनिर्वाचित राष्ट्राध्यक्षांसमवेत समन्वयाने काम करण्यास उत्सुक असल्याचे सांगून मोदींनी श्रीलंकेत घटनात्मक मार्गाने स्थैर्य पुनप्रस्थापित व्हावे, अशी अपेक्षा व्यक्त केली. विक्रमसिंघेंशी भारताशी व भारतीय नेत्यांशी निकटचे संबंध आहेत. त्यांना मेमध्ये श्रीलंकेच्या पंतप्रधानपदी नियुक्त करण्यात आले होते. राष्ट्राध्यक्ष राजपक्षे देश सोडून गेल्यानंतर १३ जुलैला त्यांना काळजीवाहू राष्ट्राध्यक्षपदी नियुक्त करण्यात आले होते. विक्रमसिंघे यांनी २२ जुलै रोजी दिनेश गुणवर्धने यांची पंतप्रधानपदी नियुक्ती केली होती.

दरम्यान, कोलंबोतील भारतीय उच्चायुक्त गोपाळ बागळे यांनी मंगळवारी नवनियुक्त पंतप्रधान गुणवर्धने यांची राजकीय शिष्टाचारानुसार भेट घेऊन भारत सरकार आणि भारतीय नागरिकांतर्फे त्यांचे अभिनंदन केले. भारतीय उच्चायुक्तालयाने ट्वीट केले, की उच्चायुक्तांनी भारत-श्रीलंकादरम्यानचे दीर्घकालीन संबंध अधिक दृढ करण्यासाठी पंतप्रधानांच्या मार्गदर्शनासाठी त्यांचे आभार मानले.

भारतातर्फे आतापर्यंत चार अब्ज डॉलरची मदत मंगळवारी टंचाईग्रस्त श्रीलंकेला तमिळनाडू सरकारद्वारे देण्यात आलेला तांदूळ व औषधे सुपूर्द करण्यात आली. हा मदतीचा तिसरा टप्पा आहे. उच्चायुक्तालयातर्फे सांगण्यात आले, की भारत सरकार व भारतीय नागरिक श्रीलंकावासीयांसोबत आहेत. तमिळनाडू सरकारतर्फे देण्यात आलेली ही मदत तीन अब्ज चार कोटी रुपयांपेक्षा अधिक आहे. या वर्षी जानेवारीपासून आतापर्यंत श्रीलंकेला भारतातर्फे सुमारे चार अब्ज डॉलरची मदत देण्यात आली आहे.






विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

# मृत्यूकडून जीवनाकडे...

आधुनिक केसरी

कधी कधी हे सत्य हे कल्पनेपेक्षा भयानक असते. आपण स्वप्नातही कल्पना करू शकणार नाही अशा गोष्टी प्रत्यक्षात घडतात. अशीच ही एका मुलीची कथा. अक्षरशः मृत्यूच्या दाढेतून वाचलेली. जगण्याची दुर्दम्य इच्छाशक्ती कोणता चमत्कार घडवू शकते, त्याचे प्रत्यंतर देणारी. ही घटना आहे २४ डिसेंबर १९७१ ची.

ज्युलियन कोपकी, एक १७ वर्षांची मुलगी. पेरू देशाची राजधानी लिमा येथे शिक्षणासाठी आलेली. नुकतेच हायस्कुलचे शिक्षण पूर्ण झालेले. तिचे आईवडील तेथून जवळच असलेल्या अमेझॉनच्या जंगलात एक प्रयोगशाळा स्थापून प्राणिशास्त्र आणि पक्षीशास्त्रावर संशोधन करीत असतात. तिची आई काही कामानिमित्त लिमा येथे आलेली होती. नाताळचा सण फक्त काही दिवसांवर आलेला होता. ज्युलिअनच्या डोळ्यात नाताळ साजरा करण्याची स्वप्ने तरळत होती. आपल्या वडिलांना भेटण्यासही ती उत्सुक होती. खरे तरतिच्या आईला आपले काम संपवून १९ किंवा २० डिसेंबरला परत आपल्या प्रयोगशाळेकडे जायचे होते . पण ज्युलिअनच्या शाळेत पदवीदान समारंभ २३ डिसेंबरला असल्याने ती थांबते आणि दोघीही तो कार्यक्रम आटोपल्यावर आपल्या त्या अमेझॉनस्थित असलेल्या घराकडे आणि प्रयोगशाळेकडे जाण्याचे ठरवतात.

चोवीस डिसेंबरच्या विमानाचे तिकीट बुक करण्यासाठी त्या प्रयत्न करतात. पण सुट्या आणि नाताळ असल्याने सगळ्या विमानांची तिकिटे आधीच आरक्षित झालेली असतात. खूप प्रयत्न केल्यानंतर त्यांना लांसा एअरलाईन्स ५०८ या विमानाचे तिकीट मिळते. त्या ज्युलिअनच्या वडिलांना ही बातमी कळवतात. लांसा ही विमानकंपनी तशी फारशी चांगली नाही. तिच्या विमानांना अपघात झाले आहेत. तेव्हा त्या विमानाने येऊ नका असे तिचे वडील कळवतात. पण दुसऱ्या कोणत्याही विमानाचे तिकीट उपलब्ध नसल्याने त्या दोघी याच विमानाने यायचा निर्णय नाईलाजाने घेतात.

२४ डिसेंबरची रात्र त्यांच्यासाठी काळरात्र बनून उभी ठाकते. त्या दिवशी विमान येते तेच सात तास उशिरा. खराब हवामानामुळे विमानाला उशीर झालेला असतो. विमानाची वाट पाहण्यातच सारा उत्साह मावळलेला असतो. अखेर एकदाचे विमान येते. सगळेजण आपापल्या आसनांवर स्थानापन्न होतात आणि विमान हवेत झेपावते. तसा तर तो प्रवास तासाभराचाच असतो. त्यामुळे उशीर झाला तरी एक तासाने आपण आपल्या घरी जाऊ ही आशा मनात असते. पण थोड्याच वेळात वातावरणात बदल होतो. विमान काळ्या ढगांमधून वाटचाल करते. विजा चमकू लागतात. **(क्रमशः)**



# आनंदी पहाट

## आनंदाची अंतिम पातळी प्राप्त करावी

आधुनिक केसरी

आनंदी होण्यासाठी, आपल्याला इतर लोकांची किंवा भौतिक गोष्टींची गरज नसते. आनंद हा वैयक्तिक प्रयत्नांचा आणि उद्देशपूर्ण जीवन जगण्याचा परिणाम असतो. वैज्ञानिक प्रयोगांव्दारे असे स्पष्ट होते की, आनंदी राहणे आपल्या आरोग्यासाठी मोठे फायदेशीर ठरू शकते. आनंदी राहणे निरोगी जीवनशैलीला प्रोत्साहन देत असते. आनंदी राहण्याने, तणावाचा सामना करण्यास, आपली रोगप्रतिकारक शक्ती वाढवण्यास, आपल्या हृदयाचे रक्षण करण्यास आणि वेदना कमी करण्यात मदत करू शकते. इतकेच काय, त्यामुळे आपले आयुर्मानही वाढू शकते. अस्सल, निखळ, निरपेक्ष आनंद आतून, आपल्या अंतरंगातून येत असतो. आनंदी राहण्यासाठी प्रत्येक विचार, वर्तन आणि व्यवहार निवडण्यासह जीवनात प्रत्येक गोष्ट सुज्ञपणे निवड करण्याची जरुरी असते. जेव्हा आपली बाह्य परिस्थिती चांगली असते, तेव्हा आपल्याला आनंद मिळविणे सोपे होऊ शकते, परंतु ते त्याचे कारण नसते. आपल्या सभोवतालच्या गोष्टी आपल्या मनासारख्या नसल्या तरीही आपण आनंदी राहू शकतो. आनंदी व्यक्ती कमी चिंताग्रस्त, कमी उदासीन, कमी तणावग्रस्त, बरे वाटतात; ते अधिक आशावादी असतात आणि आत्मविश्वास बाळगत असतात, जीवनाचे कल्याण झाल्याचे अनुभवतात, जीवनाबद्दल अधिक उत्कटता असते, त्यांना जीवनाचा अर्थ आणि उद्देश यांची तीव्र जाणीव असते आणि ते जगाला एकसारखे पाहतात. मूलतः एक मैत्रीपूर्ण व्यक्ती, चांगले लोक आणि भरपूर आनंद प्रथम शोधला पाहिजे. आनंदाची "अंतिम पातळी" प्राप्त झाल्यानंतरच एखाद्याला सत्याची भूक लागते. दुसऱ्या शब्दांत, बहुतेक व्यक्तींसाठी सत्यापेक्षा आनंद हे अधिक महत्त्वाचे उद्दिष्ट असल्याचे दिसते, परंतु, एकदा आनंद प्राप्त झाला की, त्यांच्यासाठी सत्य शोधणे अधिक महत्त्वाचे बनते.



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655



आधुनिक केसरी

## जाणेल तो नर । संत जीवा ।।

तुझे रूपी मज । येतसे प्रचिती ।।
कळू येते प्रीति । अमूर्ताचि ।।१ ।।

दिव्य तेज दिसे । शब्दातीत असे ।।
अंतरात वसे । भाव रूप ।।२ ।।

अनुभूती घ्यावी । ज्याची त्याने जाणा ।।
अरे मेल्यावीना । स्वर्ग कैसा ? ।। ३ ।।

वात्सल्याची मूर्ती । असता सामोरी ।।
शोधी दारोदारी । देव कोठे ? ।। ४ ।।

सगुणात वसे । निर्गुण ईश्वर ।।
जाणेल तो नर । संत जीवा ।। ५ ।।|



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

# "निरुपण"

आधुनिक केसरी

**पंढरीचा महिमा । देतां आणीक उपमा ॥**
**ऐसा ठाव नाहीं कोठें । देव उभाउभी भेटे ॥**
**आहेति सकळ । तीर्थे काळें देती फळ ॥**
**तुका म्हणे पेठ । भूमिवरी हे वैकुंठ ॥**

जगद्गुरू संत श्री तुकोबाराय या अभंगात पंढरीचा महिमा वर्णन करतात. पंढरीचा महिमा वर्णावा, तितका कमी आहे. अनुपम आहे. असे ठिकाण अन्य कोठे नाही, येथे भगवंत भक्ताला सहज भेटतो. तो भक्तासाठी तर उभा आहे. अनेक तीर्थक्षेत्र आहेत. परंतु ती कालांतराने फळ देतात. पंढरी मात्र सद्यःफळ देणारी आहे.

अभंगाच्या शेवटच्या चरणात तुकोबाराय म्हणतात, की पंढरी ही भक्तीची पेठ आहे. पंढरी म्हणजे साक्षात भूवैकुंठ आहे.

या सुंदर अशा अभंगात जगद्गुरू संत श्री तुकोबारायांनी पंढरीचे महात्म्य अतिशय सोप्या आणि आशयघन शब्दांत वर्णिले आहे. तुकोबारायांनी या अभंगात पंढरीला भूवैकुंठ असे संबोधले आहे. तसेच पंढरी ही भक्तीचे भांडार आहे.

रुक्मिणीरमण पांडुरंग परमात्मा नामब्रह्म आहे. तो पंढरीला भक्तासाठी कमरेवर हात ठेऊन उभा आहे. जणू तो भक्ताची वाट पाहतो. तसेही भक्त आणि भगवंत याचं नातं अलौकिक अशा प्रकारचं असतं. दोघेही जणू एकमेकांची वाट पाहत असतात. दोघांनाही परस्पर भेटीची ओढ असते.



डॉ. चन्द्रहासशास्त्री
सोनपेठकर

# "मनी नाही भाव आणि देवा मला पाव"

आधुनिक केसरी

मनात शुद्ध भाव असेल तर परमात्मा कोठूनही प्रगट होतो. 'जसे शरीरात पित्त, तसे संसारात वित्त आणि भक्तीमध्ये चित्त !' भक्तीची परमोच्च अवस्था प्राप्त झाली की मनुष्य स्वतःच देवपदाला पोहचतो असे सर्व संत सांगतात. भक्त आणि भगवंत एकच होऊन जातात. समर्थांचे आराध्य दैवत प्रभू श्रीराम आहेत. प्रभू श्रीराम पतितपावन आहेत, शरणागतवत्सल आहेत. 'शरण आलेल्याचे रक्षण करणे' हे श्रीरामाचे ब्रीद आहे. त्यासाठी आपण 'शरण' जाणे गरजेचे आहे. शरण जाणे याचा अर्थ खूप विशाल आहे. दैनंदिन व्यवहारात कोणी आपले काम करावे, कोणी आपल्याला मदत करावी म्हणून आपण त्याला 'कृपया' असे म्हणतो. देवापुढे शरण जाणे आणि दैनंदिन व्यवहारात 'कृपया' म्हणणे यात जमीन अस्मानाचे अंतर आहे. न्यायालयात शरणागतीचे प्रतिज्ञापत्र सादर करणे एकवेळ सोपे पण भगवंतापुढे शरण जाणे अतिमुश्किल! कारण सर्व संत असे सांगतात की सर्व सोडायची मनुष्याची तयारी असते पण 'मीपणा' सोडता येत नाही. ज्याला 'मीपण' सोडता येते त्याने बाकी काही सोडले नाही तरी चालते. 'भाव शुद्ध करून देऊ शकेल' असे कोणतेही यंत्र बाजारात उपलब्ध नाही. त्यासाठी अंतरशुद्धी महत्वाची आहे. 'रामाला मनापासून हाक मारली तर तो हाकेला ओ देतो, भक्ताची लाज राखतो' असा आजपर्यंतचा अनेक संतांचा आणि श्रेष्ठ भक्तांचा अनुभव आहे.

"जे अंकित ईश्वराचे । तयांस सोहळे निजसुखाचे ।
धन्य तेचि दैवाचे । भाविक जन ॥" (दा.०३.१०.१२)

रामाच्या चरणस्पर्शाने देवी अहल्येचा उद्धार झाला. रामाच्या पायातील तोडरांचा आवाज येणे याचा अर्थ राम स्वतः उपस्थित असणे. 'दीन' होऊन रामाला शरण जावे असेही समर्थ आपल्याला सांगतात. 'दीन' होणे म्हणजे आपले 'मी'पण नष्ट होणे. जिथे साक्षात राम आहे तिथे सर्व मंगल असणारच, नाही का? तर्काच्या युक्तींना आणि माणसाच्या भाषेला मर्यादा आहेत. म्हणून अतिचिकित्सा न करता आपण रामाला शरण गेलो की तो आपल्याला सांभाळतोच. हा मनाचा श्लोक आणखी सुलभतेने समजण्यासाठी अभंग स्वरूपात देत आहे.

"किती प्रकारांनी । समजाऊ तुज । एक रामराज । दृढ धरी ।३३०॥
एक रामरत्न । हातमधे येण्या । करावे प्रयत्ना । बहुतसे ॥३३१॥
प्रेमाने ते जन । वश, अनुभव । मग काय देव । वश नाही ॥३३२॥
पायीचे तोडर । सांगते गर्जून । " मी भक्त रक्षण । करीतसे "॥३३३॥
कंठरव त्याचा । ऐकूनिया मना । रामाच्या चरणा । भज नित्य ॥३३४॥
तन-मन-धन । रामासी अर्पून । कौसल्यानंदन । दृढ धरी ॥३३५॥"

**(संदर्भ : सौ. मनीषा अभ्यंकर कृत अभंग मनोबोध )**

# ।। साधन - चतुष्टय ।।

आधुनिक केसरी

कोणतीही इमारत बांधीत असताना अगोदर तिचा पाया जसा घालावा लागतो, त्याप्रमाणे परमार्थ साधण्यासाठी अगोदर साधनांचा पाया घालावा लागतो. शास्त्राने चार प्रकारचे साधन सांगितले आहे. प्रथम, नित्यानित्यवस्तुविवेक करावा. अनित्य जो विषय त्याच्या बाबतीत आपण उदास व्हावे आणि नित्य जो भगवंत त्याच्याकडे लक्ष द्यावे. नंतर, या जगातल्या किंवा स्वर्गातल्या भोगाची वासना नाहीशी करावी. हे दुसरे साधन होय. आपले मन बाह्य विषयांकडे धाव घेते; तिथून त्याला खेचून आणावे आणि भगवंताकडे लावावे. आपण चूक केली नसतानाही कोणी जाच केला तरी शांतपणे सहन करावे, गुरूच्या सांगण्यावर विश्वास ठेवावा, हर्ष विषाद न मानता संतोषाने राहावे; हे तिसरे साधन होय. शेवटी, भगवंताच्या भेटीची खरी तळमळ लागावी. ही सर्व साधनसामग्री असेल तरच साधकाला ब्रह्मदर्शन घडेल. ब्रह्मदर्शन होण्यासाठी कडकडीत वैराग्य असावे लागते. पैशाचा लोभ पूर्णपणे गेला पाहिजे. मनामधली कामवासना पूर्णपणे गेली पाहिजे. मोहाला बळी पडता कामा नये. नुसता प्रपंच चांगला करणे हे काही मनुष्यजन्माचे ध्येय नव्हे. जनावरेदेखील आपापला प्रपंच करतातच. मनुष्याने



भगवंताची उपासना करून त्याची प्राप्ती करून घेतली पाहिजे, तरच प्रपंचातल्या कष्टांचे सार्थक होते. सध्याच्या परिस्थितीमध्ये उपासना करायला नामासारखा सोपा उपाय नाही. खरोखर, भगवंताच्या नामामध्ये फार मोठे सामर्थ्य साठविलेले आहे. त्याचे नाव घेऊन जो जगात वावरेल, त्याला व्यवहारामध्ये नेहमीच यश येईल असे नाही, परंतु भगवंत त्याची लाज राखील यात शंका नाही. प्रपंचातले यश आणि अपयश या तात्पुरत्या गोष्टी आहेत. भगवंताच्या अनुसंधानाला खरे महत्त्व आहे. रामाच्या इच्छेनेच आपल्याला सुखदुःख भोगावे लागते, पण हे आपल्याला सर्वाच्या शेवटी आठवते, म्हणून सुखदुःख बाधते. म्हणून आपण सुरुवातीपासूनच रामाची इच्छा लक्षात ठेवून वागू. यासाठी त्याच्या नामाची गरज आहे. प्रपंचाची तऱ्हा अशी असते की, आज सुख झाले म्हणून जरा बरे वाटले, की लगेच उद्या दुःखाचे ताट पुढे वाढून ठेवलेले असते. म्हणून, एका डोळ्यात सुखाचे अश्रू, तर दुसऱ्या डोळ्यात दुःखाचे अश्रू ठेवून माणसाने प्रपंचात वागावे. प्रत्येक गोष्ट भगवंताच्या इच्छेनेच जर घडते, तर एकीचे सुख आणि दुसरीचे दुःख का मानावे ? शहाण्या माणसाने आपले चित्त भगवंताच्या नामात गुंतवून ठेवावे, आणि बरावाईट जसा प्रसंग येईल त्यात सामील होऊन जावे. जो नाम घेईल त्याच्या मागे राम उभा आहे. नाम घेणाऱ्याचे राम कल्याण करतो, एवढे माझे सांगणे शेवटर्यंत विसरू नका.

**आजचे बोधवचन :** अती प्रेमाने नाम घ्यावे. नामात तल्लीन
झाल्यावर देहाची सुखदुःखे बाधणार नाहीत. श्रीराम समर्थ

**– श्री सद्गुरु ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज**

# पुसद न.प.ची घरगुती नळ बिलात अवाजवी वाढ

आधुनिक केसरी न्यूज

**पुसद :** न.प. ने मे २०२२ सर्वच प्रकारच्या पाणी करांमध्ये मोठी वाढ केली असून त्यापैकी सर्वसामान्य नागरिकांच्या घरगुती नळ बिलात तब्बल ७८ टक्के वाढ झाल्याने नागरिकांमध्ये ओरड होत आहे. दरम्यान झालेली पाणी करवाढ नप च्या मासिक सभेत झाली नसून प्रशासक काळात झाला आहे.

मागील काही वर्षात पाणी पुरवठा विभागाचे काम अन्य विभागापेक्षा चांगले होते व आहे हे देखील मान्य करावेच लागेल. कनिष्ठ अभियंता भूषण जाधव व सलाउद्दीन यांच्या देखरेख मध्ये दररोज किमान १ तास पाणी पुरवठा पुसदला शहराला होत आहे. यापूर्वी मागील ९ वर्ष माजी सभापती राजूभाऊ यांनी अथकपरिश्रम घेत पूस धरण पासून थेट पाणी पुरवठा योजना पूर्णत्वास आणली. ती योजना डिसेंबर २१ मध्ये उमाकांत पापीनवार यांच्या कार्यकाळात सुरू झाली. सुमारे १० वर्षापूर्वी मासिक १०० रु. चे नळबिल १७५ रु. झाले. त्यानंतर आता मे २०२२पासुन यामध्ये तब्बल ७८ टक्के म्हणजे १३८रु वाढ करण्यात येऊन आता घरगुती मासिक बिल ३१३ रुपये करण्यात आले आहे. तर थकीत बिलावर विलंब शुल्क द.सा.द.शे. १८ टक्के इतका कायम ठेवण्यात आला आहे. दरम्यान व्यावसायिक ग्राहक (हॉटेल, कॅन्टीन, बार, रेस्टोरंट) यांना नवे दर १२३०रु, दवाखाने ६००रु आकारण्यात आला. घरगुती नळबिळात भरपूर वाढ केलयाने पुसदकर नाराज असून सामान्य गरीब जनतेची मोठी ओरड आहे.

# औराळा ते जेहूर या सात किलोमीटर रस्त्याची मोठी दुरावस्था

आधुनिक केसरी न्यूज



**औराळा :** कन्नड तालुक्यातील औराळा ते जेहूर या रस्त्याची रस्त्याची मोठी दुरवस्था झाली असून यामुळे वाहनधारकांचे मोठी हाल होत आहे. गेल्या अनेक वर्षापासून या रस्त्याची दुरुस्ती करण्याची मागणी परिसरातील शेतकरी व वाहनधारकांमधून केली जात आहे. त्यात सध्या सुरू असलेल्या रिमझिम पावसामुळे रस्त्यावर चिखलाचे साम्राज्य पसरला आहे.

काही ठिकाणी खड्ड्यांमध्ये जागोजागी पाणी साचल्याने पाण्याची डबके व पातळ चिखल यामुळे ग्रामस्थांना मोठा व्यवस्था सहन करावा लागत आहे या रस्त्याची तातडीने दुरुस्ती करण्याची मागणी परिसरातील ग्रामस्थांनी केली आहे.

औराळा ते जेहूर हा रस्ता परिसरातील २० खेड्याच्या नागरिकोची दळणवळणाची अत्यंत वाईट परिस्थिती झालेली आहे येथील नागरिकांना शेताकडे जाणाऱ्या शेतकरी बांधवांना चिखलातून येणे जाणे करावी लागत आहे तसेच या रस्त्याने शाळकरी विद्यार्थ्यांना रस्त्यावरील चिखल तुडवत जावे लागते आहे हा रस्ता दुरुस्ती करण्याची मागणी येथील ग्रामस्थ करत आहे.




# डॉ. भिमराव पुडंगे यांच्या पुस्तकाचे प्रकाशन

आधुनिक केसरी न्यूज

**घनसावंगी :** मॉडेल डिग्री कॉलेज येथील समाजशास्त्र विभाग प्रमुख डॉ. भिमराव पुडंगे यांच्या हुंडा पध्दती एक समाजशास्त्रीय दुष्टिक्षेप या पुस्तकाचे प्रकाशन माजी आरोग्यमंत्री तथा आमदार राजेश टोपे व राष्ट्रवादी वक्ता सेलचे प्रदेशाध्यक्ष प्रदीप साळुंखे यांच्या हस्ते तीर्थपुरी येथे नुकतेच गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्कार सोहळ्याप्रसंगी करण्यात आले तसेच महाविद्यालयातील गुणवंत विद्यार्थी योगेश गुंजकर, अनंता शिंदे, निलकंठ देवंडे, मुदशीर बेग, समीर शेख, आरद शेख यांचा सत्कार यावेळी करण्यात आला.

यावेळी उत्तमराव पवार शैलेंद्र पवार प्राचार्य डॉ. चंद्रसेन कोठावळे, डॉ. कन्नुलाल विटोरे, डॉ. ऋषी बाबा शिंदे प्रा. भागवत गोरे गणेश सुरोशे आदींची उपस्थिती होती. यावेळी डॉ. भीमराव पुडंगे यांचें डॉ. बाळासाहेब सोनवणे, प्रा.खडु नवखडे, डॉ.सतोष गायकवाड, डॉ.सभाजी मराठे, प्रा.शरद सुबुगडे यांनी अभिनंदन केले.

# जनतेच्या कामासाठी सदैव तत्पर राहील : मनोज पवार

## बसस्थानकावरील खड्डे स्वखर्चातून बुजवल्याने प्रवाश्यांतुन कौतुक

आधुनिक केसरी न्यूज



**कन्नड :** पावसाळा सुरू झाला की कन्नड बस स्थानकात पाणी साचते व प्रवाशांची चांगलीच फजीता होते गावी जाणारे प्रवाशी घरून निट नेटके येतात पण बसस्टॉप मध्ये आले की गढुळ पाणी व चिखलातुन जाऊन बस पकडावी लागते लहान मुले व वयवृध्दांचे तर अक्षरक्ष अंगावर खराब व गढुळ पाणी पडुन कपडे चिखलाने माखले जाते पण या कडे दर वर्षी या कडे आगर प्रमुख सदरील कामासाठी प्रस्ताव पाठविला आहे. मंजुरी मिळाल्यास लगेच कामला सुरुवात केल्या जाईल असे सांगुन वाटाण्याच्या शेंगा हातावर देतात मात्र घाणेरडे साचलेले तळे घाणीचे साम्राज्य या संदर्भात शहरातील युवा उद्योजक मनोज पवार यांच्या कानावर पडताच याची दखल घेत युवा उद्योजक मनोज पवार यांनी स्वखर्चातून ते खड्डे बुजविले. यामुळे प्रवाशांनी समाधान व्यक्त केले आहे.

कन्नड बसस्थानक दुरुस्ती व बस स्थानकातील खुल्या जागेवरील पावसाळ्यापूर्वीची कामे आगाराने आधीच करायला हवी होती. मात्र गेल्या कित्येक दिवसांपासून या आगारात मोठमोठे खड्डे पडले आहेत. या खड्ड्यांमध्ये आता पावसाचे पाणी साचत आहे. या ठिकाणी येणाऱ्या प्रवास करणाऱ्या प्रवाशांना व नागरिकांना हा त्रास सहन करावा लागणार ही बाब युवा उद्योजक मनोज पवार यांच्या लक्षात येता आपण ही समाजाचे काही देणे लागतो. तत्काळ स्वखर्चातून तात्पुरत्या स्वरूपात खडी व मुरूम आणून कन्नड बस स्थानकातील पाणी साचलेले खड्डे बुजविण्याचे काम हाती घेऊन ते पुर्ण ही केले या मुळे प्रवाशी त्यांचे कौतुक करत आहेत.

# गावाच्या लोकसंख्येच्या तिप्पट वृक्ष लागवड करून पोस्टल विमा योजनेचा फायदा करूया : सविता निकम

आधुनिक केसरी न्यूज

**कन्नड़ :** तालुक्यातील नादरपुर येथे मंगलवार सकाळी विविध मुद्या वर विशेष ग्राम सभेचा आयोजन सरपंच सविता निकम,उपसरपंच सागर निकम,ग्रामसेवक श्री बनकर यांच्या अध्यक्षस्थानी आयोजन करण्यात आले होते, ग्रामसेभेची सुरवात स्वतंत्रताच्या 75 व्या महोत्सव निर्मित "घरों घरी" तिरंगा या विषया पासून करण्यात आले होते, श्रीमती निकम म्हणत होते की दीवसेंदीवस पर्यवारनाचा व्यास होत चाल्ला आहे, कोरोना काळात जसी ऑक्सीजन ची कमी भासत होती तसी कमी भविष्यत अजुन ही भासु शकते या करिता व्रुक्षणचि लागवड करून त्यांचे संगोपन करने अत्यंत गरजेचे आहे, त्याकरिता नादरपुर गावन लोकसंखेच्या तीन पट वृक्ष लागवड करण्याचा कार्यक्रम हाथी घेतला आहे, त्यात ग्रामथांनी सहभाग नोंदविन्याची गरज आहे.

तसेच गावातील लोकसहभागातुन पानी पट्टी गोळा करने,कोविड लसिकरन चे बूस्टर डोस, मंकी पॉक्स,रोग नियंत्रण प्रतिबंधक, पोस्टात नवीन आलेल्या विमा विमा योजना, तसेच गावातील पडझड झालेल्या भिंति तत्काळ दुरुस्त करने, आदि विषया वर चर्चा करण्यात आली, यावेळी तंटामुक्ति अध्यक्ष ,शालेय समिति अध्यक्ष, शिक्षक, ग्रामसेवक, आरोग्य सेवक,ग्रामथांची मोठ्या संखेने उपस्थिति होती. कार्यक्रमाचे प्रस्तावीक रामहरि सर यांनी केले, आभार प्रदर्शन लक्ष्मण बळी यांनी केले.

# शेतकऱ्यांनो सावधान ! पैठणमध्ये बोगस किटकनाशकाची विक्री ?

आधुनिक केसरी न्यूज

**पैठण :** पैठण तालुक्यातील पाचलगाव येथील प्रगतशील शेतकरी बद्रीनाथ बोबले यानी कपाशी पिकावर फवारणी करण्यासाठी (UPL) कंपनीचे उलाला (ULALA) किटकनाशक पैठण शहरातील विलास पहाडे यांच्या विकास कृषी सेवा केंद्रातुन २५० ग्रमच्या दोन बॉटल (१९५०) किमंतीचे सोमवारी खरेदी केले व शेतात फवारणी साठी गेले असता एका बॉटलमधे पाढंर्या कलरचे तर दुसर्या बॉटलमधे काळ्या कलरचे औषधी निघाल्याने त्यांना संशय आला असता त्यांनी कृषी दुकानदाराकडे हा प्रकार मांडला असता पहाडे यांनी सुरवातीला हे किटकनाशक आमच्याकडे खरेदी केले नसल्याचा कागावा केला व पावती दाखवल्याने सत्य उघडकीस येवू लागल्याने प्रगतशील शेतकरी यांनी पंचायत समितीच्या अंतर्गत असलेल्या तालुका कृषी अधिकारी यांना बोलावुन किटकनाशक बोगस असल्याची माहिती देवुन तात्काळ पंचनामा करण्याची मागणी केली असता तालुका कृषी अधिकारी विकास पाटील यांनी पहाडे यांच्या दुकानातील (UPL) कंपनीचे उलाला (ULALA) किटकनाशकाची पंचा समक्ष तपासणी केली असता एका बॉटलमधे युरिया सारखे पांढरे तर दुसर्या बॉटलमधे काळे औषधी निघाल्याने हे किटकनाशक बोगस आहे कि काय म्हणून दुकानातील सात पैकी तीन बॉटलचे सँपल तपासणी साठी घेतले असुन तपासणी अंती हा प्रकार उघडकीस येईल. मात्र या आधी कितीतरी शेतकऱ्यांनी या किटकनाशकाची फवारणी केली असल्याने त्यांची नक्कीच फसवणूक झाली असावी.

यावेळी पंच म्हणून स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे युवा जिल्हाध्यक्ष ज्ञानदेव मुळे,राष्ट्रवादी युवक कॉंग्रेसचे जिल्हाउपाध्यक्ष संजय सदावर्ते यांची उपस्थिती होती. यावेळी ज्ञानदेव मुळे यानी जो पर्यंत (UPL) कंपनीचे उलाला कपाशीवर फवारणीसाठीचे (UPL) कंपनीचे उलाला (ULALA) किटकनाशकाची जो पर्यंत तपासणी अहवाल येत नाही तोपर्यंत विक्रीसाठी बंदी असावी व शेतकर्यांची फसवणूक करणार्या कंपनी तसेच बोगस किटकनाशकाची विक्री करत असलेल्या कृषी सेवा केंद्रावर योग्य कारवाई करावी अशी मागणी केली.



# भाजप आघाडीवर

आधुनिक केसरी

मध्य प्रदेशात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीचे निकाल नुकतेच जाहीर झाले. यामध्ये सत्ताधारी भारतीय जनता पक्षाला सर्वाधिक जागा मिळाल्या असल्या तरी, अनेक ठिकाणी महापौरपदी त्यांचे उमेदवार पराभूत झाले. राज्यात नेहमीच भाजप विरुद्ध काँग्रेस असा सरळ सामना असतो. मात्र यावेळी आम आदमी पक्षाने एका ठिकाणी महापौरपद पटकावत या दोन प्रस्थापित पक्षांना धक्का दिला. मध्य प्रदेशात राजकारणातील हा तिसरा कोन तयार होणार काय, याची आता चर्चा सुरू झाली आहे. गेल्या म्हणजे २०१७मध्ये भाजपकडे सर्व १६ महापौरपदे होती. यंदा भाजपला ९ ठिकाणी तर प्रमुख विरोधी पक्ष असलेल्या काँग्रेसला ५ तर आम आदमी पक्ष व भाजप बंडखोराला एका ठिकाणी महापौरपद मिळाले. मध्य प्रदेशात महापौर थेट म्हणजे जनतेतून निवडला जातो. आपल्यासारखी नगरसेवकांमधून निवड होत नाही. त्या अर्थाने महापौरपद म्हणजे एका शहरावर सत्ता असा सरळ हिशेब. एकेका शहरात विधानसभेचे अनेक मतदारसंघ असतात. या निकालांकडे त्या दृष्टीने बघायला हवे. ग्वाल्हेरमध्ये गेली ५७ वर्षे भाजपचा महापौर होता. तर जबलपूरमध्ये १८ वर्षे. दोन्ही ठिकाणी काँग्रेसने यश मिळवले. रेवामध्ये जवळपास २४ वर्षे भाजपचा महापौर होता तेथेही धक्का बसला. तर उज्जैन, सतना, बुऱ्हाणपूर येथे कमी मताधिक्याने भाजपचे महापौर झाले. मार्च २०२० मध्ये ज्योतिरादित्य शिंदे समर्थकांसह काँग्रेसमधून भाजपमध्ये सामील झाले. ग्वाल्हेर हे शिंदे यांचे प्रभावक्षेत्र. मात्र मूळचे भाजपचे आणि बाहेरून आलेले. या वादात पक्ष पराभूत झाला. ग्वाल्हेर-चंबळ खोऱ्यात भाजपने नरेंद्रसिंह तोमर तसेच ज्योतिरादित्य शिंदे हे दोन केंद्रीय मंत्री तसेच शिवराजसिंह चौहान मंत्रिमंडळातील नऊ जण प्रचारात उतरवले होते. मोरेना हे भाजप प्रदेशाध्यक्ष व्ही. डी. शर्मा यांचे कार्यक्षेत्र तेथेही पक्षाला धक्का बसला. काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष कमलनाथ यांनी आपला बालेकिल्ला असलेल्या छिंदवाड्यासह पक्षाला पाच ठिकाणी महापौरपदे मिळवून दिली. अर्थात काँग्रेसने काही महापौरपदे जिंकली असली तरी त्यांची राज्यातील एकूण कामगिरी सुधारलेली नाही. केंद्रातील सत्तेचा लाभ (डबल इंजिन) मध्य प्रदेशात आपसूकच भाजपला होणार आहे. राज्यात भाजपचे संघटन जुने आहे. त्यामुळे नरेंद्र मोदी-शिवराजसिंह चौहान यांच्या प्रतिमेच्या जोरावर भाजपला यशाची अपेक्षा आहे. राज्यात आम आदमी पक्ष एका ठिकाणी महापौरपद मिळवल्यानंतर कितपत विस्तार करतो, यावर विधानसभेचा सामना दुरंगी की बहुरंगी होणार हे अवलंबून आहे. तूर्तास तरी राज्यात अनेक वर्ष चालत आलेल्या सरळ लढतीत तिसरा भिडू आला आहे हे मान्य करावे लागेल.



पंकज वसंत पाटील
मो. 9850439579

# ।। अवघी विठाई माझी ।।

आधुनिक केसरी

**आपल्या कामातच ईश्वर पाहणाऱ्या संत सावता माळी या विठ्ठलाच्या लाडक्या कर्मयोगी भक्ताने अरण या मुळगावीच आषाढ वद्य चतुर्दशी शके १२१७ (दि.१२ जुलै १२९५) रोजी आपला देह ठेवला. सावता महाराजांच्या शेतातच त्यांचे समाधिमंदिर आहे. गावोगावच्या दिंड्या पंढरपूरला जातात, पण त्याउलट पंढरपूरच्या विठ्ठलाची दिंडी दरवर्षी संत सावता माळी यांच्या भेटीसाठी अरणगावला जात असते. काळ्या आईची सेवा करून स्वतः देवाला आपल्या मळ्यात बोलावणारे महान कर्मयोगी संत श्रीसावता महाराजांना पुण्यतिथीनिमित्त कोटी कोटी प्रणाम.**

भक्त व संतादिमंडळी भगवंताकडे दर्शनार्थ येतात पण स्वतः विठ्ठल ज्यांच्याकडे गेले ते पंढरीनाथाचे लाडके भक्त म्हणजे संत सावता माळी होय. पंढरपूरजवळच असलेल्या माढा तालुक्यातील अरणभेंडी या गावच्या, व्यवसायाने माळी आलेल्या संत सावता यांनी आपल्या जीवनाचा मळा विठ्ठलभक्तीने सिंचून त्यातून अभंगरूपी पीक काढले.

नामाचिये बळे न भीऊ सर्वथा।
**कळीकाळाच्या माथा सोटे मारू।।**
**वैकुंठीचा देव आणू या किर्तनी।**
**विठ्ठल गाउनी नाचो रंगी।।**
**सुखाचा सोहळा करुनि दिवाळी।**
**प्रेम वनमाळी चित्ती धरू।**
**सावता म्हणे ऐसा भक्तिमार्ग धरा।**
**तेणें मुक्तीद्वारा वोळंगती।।**


भक्तीभावनेतील आर्तता, ईश्वरचिंतनातील तल्लीनता तसेच अद्वैत सिद्धांत सांगणाऱ्या व भावनेचा ओलावा पाझरणाऱ्या अभंगांतून त्यांनी मुक्ती, ज्ञान, मानपान यापैकी काही एक न मागता फक्त भक्ती मात्र मागितली.

आपले नित्यकर्म न सोडता विठ्ठल माऊलींच्या भक्तिरसात रमलेल्या सावता महाराजांना आपल्या नित्य कर्मातच पिकाला पाणी देतांना, मोट हाकतांना, फुललेल्या जाईजुईच्या **मळ्यातच त्याला विठ्ठलदर्शन होते. ते म्हणतात -**

**आमुची माळीयाची जात। शेत लावू बागाईत।।**
**आम्हा हाती मोट नाडा। पाणी जाते फुल झाडा।।**
**शांती शेवंती फुलली। प्रेम जाईजुई व्याली।।**
**सावताने केला मळा। विठ्ठल देखियला डोळा।।**

आपल्या मळ्यातील बहरलेल्या शेवंतीसोबतच त्यांच्या अंतःकरणातही शांती दाटून येऊन जाईजुईच्या सुगंधासह मनातही प्रेमाचे धुमारे फुटले आणि सावताने केला मळा । विठ्ठल देखियला डोळा ।। अशी दिव्य अनुभूती त्यांना आली. पंढरीनाथाच्या भक्तीपथावरील परमोच्च क्षणी सावता यांना झालेल्या विठ्ठलदर्शन प्रसंगी जागृती झालेले भाववर्णन करतांना ते म्हणतात -

**विकसिले नयन स्फुरण आले बाही।**
**दाटले हृदय करुणा भरिते।।**
**जाता मार्गी भक्त सावता तो माळी।**
**आला तया जवळी पांडुरंग।।**
**ज्ञाना नामदेव राहिले बाहेरी।**
**माळीया भीतरी गेला देव।।**
**माथा ठेवुनि हात केला सावधान।**



**दिले आलिंगन चहुं भुजी।।**
**चरणी ठेवुनी माथा विनवितो सावता।**
**बैसा पंढरीनाथा करीन पूजा।।**

ज्ञानेदव व नामदेवांना मळ्याच्या बाहेरच उभे करून पंढरीच्या विठोबाने मळ्यात जाऊन सावतोबाच्या डोक्यावर हात ठेवुन सावध केले व आपल्या चारी भुजांनी त्याला कडाडून आलिंगन दिले. भक्त व भगवंताच्या मिलनाचा अपूर्व सोहळा ज्ञानेश्वर व नामदेव महाराजांच्या साक्षीने घडल्याचे सावता महाराजांनी भजनात नमूद केले आहे. नामसंकीर्तनावर त्यांनी जास्त भर दिला. सर्वसंगपरित्याग करण्याची जरुरी नाही. प्रपंच करता करता ईश्वरप्राप्ती होऊ शकते हे त्यांनी दाखवून दिले.

परिस्थिती कधीही बदलू शकते, कोणत्या दिवशी काय वाट्याला येईल हे सांगता येत नाही. कर्मगतीची गहनता सांगतांना सावताजी म्हणतात, ऐश्वर्य उपभोगणाऱ्या माणसाने कधी पालखीत बसून सुभेदार म्हणून मिरवले असले तरी त्याचेवर कधी चाकर बनुन पायी चालण्याची वेळ येऊ शकते. कधी घरात धन्याचा कण नाही म्हणून उपाशी राहणाऱ्यालाही कधी इतकी धनदौलत मिळू शकते की कुठे साठवावी असा प्रश्न त्याला पडेल, अचानक कोणत्या दिवशी मृत्यूची धाड येऊन यमलोकी प्रस्थान करावे लागेल हे सांगता येत नाही म्हणून -

**समयासी सादर व्हावे। देवे ठेविले तैसें रहावे।।**
**कोणे दिवशी बसून हत्तीवर। कोणे दिवशीं पालखी सुभेदार।**
**कोणे दिवशीं पायाचा चाकर। चालून जावे।।**
**कोणे दिवशी बसून याची मन। कोणे दिवशी घरात नाही धान्य।**
**कोणे दिवशी द्रव्याची साठवण। कोठे साठवावे।।**
**कोणे दिवशी यम येती चालून। कोणे दिवशी प्राण जाती घेऊन।**
**कोणे दिवशी स्मशानी जाऊन। एकटे रहावे।। कोणे दिवशी**
**होईल सद्गुरूची कृपा। कोणे दिवशी चुकती जन्माच्या खेपा।**
**कोणे दिवशी सावत्याच्या बापा। दर्शन द्यावे।।**

म्हणत ते पांडुरंगाचरणी नतमस्तक होतात.

प्राणिमात्रांसोबतच शेतातल्या पिकात देव पाहणाऱ्या सावतांना शेतातील कांदा, मुळा, भाजी यातही विठ्ठलरुप दिसते तर लसूण, मिरची, कोथिंबीरीतही त्यांना हरीरुप दिसते. आपल्या शेतात काम करताना विहीरीतून मोटेने पाणी काढतांना त्यांना आपलं सर्व कामच पंढरीमय झालेलं जाणवते. काम करतानाच त्यांना विठ्ठल दर्शन झाल्याचा भास होतो.

**कांदा मुळा भाजी। अवघी विठाबाई माझी।।**
**लसूण मिरची कोथिंबिरी। अवघा झाला माझा हरी।।**
**मोट नाडा विहीर दोरी। अवघी व्यापिली पंढरी।।**
**सावता म्हणे केला मळा। विठ्ठल पायी गोविला गळा।।**

अनासक्त वृत्तीने इश्वरार्पण बुद्धीने केलेला प्रपंच परमार्थ होतो, हीच त्यांची जीवननिष्ठा होती. आपल्या शेतीच्या व्यवसायाच्या विविध रुपकातून त्यांनी आपल्या अभंगांना सर्वांगसुंदरता आणली असून त्यातून भक्ताची परमावस्था प्राप्त झाल्याची साक्ष आपल्याला पटते. शेतातिल पिकांमध्ये विठ्ठल पाहणारे संत सावतोबा आपल्याला कर्माचे श्रेष्ठत्व आपल्या लक्षात आणून देतात. सावतोबांची विहीर अजूनही अरणगावात आहे. आपल्या कामातच ईश्वर पाहणाऱ्या विठ्ठलाच्या या लाडक्या कर्मयोगी भक्ताने अरण या मुळगावीच आषाढ वद्य चतुर्दशी शके १२१७ (दि.१२ जुलै १२९५) रोजी आपला देह ठेवला. सावता महाराजांच्या शेतातच त्यांचे समाधिमंदिर आहे. गावोगावच्या दिंड्या पंढरपूरला जातात, पण उलट पंढरपूरच्या विठ्ठलाची दिंडी दरवर्षी संत सावता माळी यांच्या भेटीसाठी अरणगावला जात असते. काळ्या आईची सेवा करून स्वतः देवाला आपल्या मळ्यात बोलावणारे महान कर्मयोगी संत श्रीसावता महाराजांना कोटी कोटी प्रणाम.




श्याम बसप्पा ठाणेदार
संपर्क क्र.: ९९२२५४६२९५

# क्षेपणास्त्र प्रणालीचे जनक : डॉ. अब्दुल कलाम

आधुनिक केसरी

**इंदिरा गांधी पंतप्रधान असताना भारताने क्षेपणास्त्र विकासाचा एकात्मिक कार्यक्रम हाती घेतला. या कार्यक्रमाच्या प्रमुखपदी अब्दुल कलाम यांची नेमणूक करण्यात आली त्यामुळे ते पुन्हा डीआरडीओत दाखल झाले. तिथे स्वदेशी बनावटीचे क्षेपणास्त्र तयार करण्याचे शिवधनुष्य त्यांनी लीलया पेलले. डीआरडीओत देशातील नामवंत शास्त्रज्ञांचा संच त्यांच्याकडे होता. वैयक्तिक कामगिरीपेक्षा सांघिक कामगिरीवर त्यांचा भर असायचा. देशातील उत्तम शास्त्रज्ञांकडून सर्वोत्तम कामगिरी करून घेण्याची कला त्यांच्याकडे होती. क्षेपणास्त्र विकास कार्यातील अग्नी या क्षेपणास्त्राचे यशस्वी प्रेक्षपण केल्यावर त्यांचे जगभर कौतूक झाले. जगातील सर्वात मोठ्या लोकशाही राष्ट्राच्या राष्ट्रपतीपदी निवड झालेले डॉ अब्दुल कलाम हे तरुणांना सदैव प्रेरणा देणारे व्यक्तिमत्त्व होते. राष्ट्रपतीपदावरून निवृत्त झाल्यावर डॉ. कलाम विविध संस्थांमध्ये जाऊन व्याख्याने देत असत. २७ जुलै २०१५ रोजी तरुणांना व्याख्यान देत असतानाच त्यांचे दुर्दैवी निधन झाले. त्यांच्या आकाली निधनाने भारताच्या वैज्ञानिक क्षेत्रात जी पोकळी निर्माण झाली ती कधीही भरून निघणार नाही. डॉ ए.पी. जे अब्दुल कलाम यांना पुण्यतिथीनिमित्ताने विनम्र अभिवादन!**

भारताच्या क्षेपणास्त्र प्रणालीचे जनक, जेष्ठ शास्त्रज्ञ आणि भारताचे माजी राष्ट्रपती भारतरत्न डॉ. ए. पी. जे अब्दुल कलाम यांची आज सातवी पुण्यतिथी. १५ ऑक्टोबर १९३१ रोजी तामिळनाडूतील रामेश्वरम येथे त्यांचा जन्म झाला. त्यांचे पूर्ण नाव अबुल पाकिर जैनूलाबदिन अब्दुल कलाम असे होते. अब्दुल कलाम यांचे वडील नावाडी होते. रामेश्वरमला येणाऱ्या यात्रेकरूंना होडीने धनुष्यकोडीला नेण्या-आणन्याचे काम ते करीत. अब्दुल कलाम शाळेत असतानाच त्यांच्या वडिलांचे निधन झाले. घरची परिस्थिती अत्यंत गरिबीची असल्याने ते गावात वर्तमानपत्र विकू लागले. त्यांचे बालपण काबाडकष्ट करण्यातच गेले. शालेय शिक्षण पूर्ण झाल्यावर ते उच्च शिक्षणासाठी तिरुचिरापल्ली येथील सेंट जोसेफ कॉलेजमध्ये दाखल झाले. तेथे बीएससी झाल्यानंतर त्यांनी मद्रास इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीत प्रवेश घेतला. प्रवेशासाठी त्यांच्याकडे पैसे नसल्याने त्यांच्या बहिणीने दागिने गहाण ठेवून त्यांना पैसे दिले. या संस्थेतून एरोनॉटिक्सचा डिप्लोमा पूर्ण केल्यानंतर त्यांनी अमेरिकेतील नासा संस्थेत चार महिने एरोस्पेस टेक्नॉलॉजीचे प्रशिक्षण घेतले. भारतात आल्यावर त्यांनी सहा वर्ष डीआरडीओमध्ये शास्त्रज्ञ म्हणून काम केले. १९६३ पासून ते इसरो संस्थेत क्षेपणास्त्र विकासातील एसएलव्ही (सॅटेलाईट लॉंचिंग व्हेईकल) संशोधनात भाग घेऊ लागले. पुढे ते या प्रकल्पाचे प्रमुख बनले. इसरोचे तत्कालीन प्रमुख विक्रम साराभाई हे अब्दुल कलाम यांच्या कार्याने प्रभावित झाले. विक्रम साराभाई व अब्दुल कलाम यांच्यात गुरू शिष्याचे नाते निर्माण झाले. विक्रम साराभाई यांनी भारतात विज्ञान तंत्रज्ञानाची आघाडी डॉ.कलाम यांनी सांभाळावी असे वक्तव्य केले होते, ते पुढे कलामांनी सार्थ करून दाखवले. पुढे साराभाई यांचेच नाव दिलेल्या विक्रम साराभाई अवकाश केंद्राचे ते प्रमुख बनले. इंदिरा गांधी पंतप्रधान असताना भारताने क्षेपणास्त्र विकासाचा एकात्मिक कार्यक्रम हाती घेतला. या कार्यक्रमाच्या प्रमुखपदी अब्दुल कलाम यांची नेमणूक करण्यात आली त्यामुळे ते पुन्हा डीआरडीओत दाखल झाले. तिथे स्वदेशी बनावटीचे क्षेपणास्त्र तयार करण्याचे शिवधनुष्य त्यांनी लीलया पेलले. डीआरडीओत देशातील नामवंत शास्त्रज्ञांचा संच त्यांच्याकडे होता. वैयक्तिक कामगिरीपेक्षा सांघिक कामगिरीवर त्यांचा भर असायचा. देशातील उत्तम शास्त्रज्ञांकडून सर्वोत्तम कामगिरी करून घेण्याची कला त्यांच्याकडे होती. क्षेपणास्त्र विकास कार्यातील अग्नी या क्षेपणास्त्राचे यशस्वी प्रेक्षपण केल्यावर त्यांचे जगभर कौतूक झाले. अटलबिहारी वाजपेयी पंतप्रधान असताना ते पंतप्रधानांचे वैज्ञानिक सल्लागार बनले. पंतप्रधानांचे वैज्ञानिक सल्लागार म्हणून काम करताना देशाच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने त्यांनी अनेक प्रभावी धोरणांची आखणी



केली. त्यांनी पंतप्रधानांचे वैज्ञानिक सल्लागार व डीआरडीओ चे प्रसुख म्हणून अर्जुन हा एम. बी. टी (मेन बॅटल टँक ) रणगाडा व लाईट कॉम्बॅट एअरक्राफ्ट (एलसीए ) यांच्या निर्मितीत महत्वाची भूमिका पार पाडली. त्यांच्याच मार्गदर्शनाखाली १९९८ साली भारताने पोखरण येथे यशस्वी अणूचाचणी केली. विज्ञानाचे परमभोक्ता असणारे अब्दुल कलाम मनाने खूप संवेदनशील व साधे होते. त्यांना रुद्रविना वाजवण्याचा आणि मुलांशी गप्पा मारण्याचा छंद होता. भारत सरकारने पद्मभूषण, पद्मविभूषण व १९९८ साली भारतरत्न हा सर्वोच्च पुरस्कार देऊन त्यांचा सन्मान केला. डॉ कलाम हे अविवाहित व पूर्ण शाकाहारी होते. जगातील सर्वात मोठ्या लोकशाही राष्ट्राच्या राष्ट्रपतीपदी निवड झालेले डॉ.अब्दुल कलाम हे तरुणांना सदैव प्रेरणा देणारे व्यक्तिमत्त्व होते. राष्ट्रपतीपदावर विराजमान झाल्यावर डॉ.कलाम यांनी मुलांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन रुजविण्याचे काम केले. मोठी स्वप्ने पाहा आणि त्यासाठी भरपूर कष्ट करा असे ते तरुणांना सांगत. देशातील तरुणांवर त्यांचा खूप विश्वास होता. आपल्या देशातील तरुणांमध्ये खूप ऊर्जा आहे या ऊर्जेचा योग्य वापर केला तर देश महासत्ता बनेल असे ते नेहमी म्हणत. त्यांनी अनेक पुस्तके लिहिली. अग्निपंख, इंडिया २०-२०, इग्निटटेड माईंडस ही त्यांनी लिहिलेली पुस्तके खूप गाजली. अग्निपंख हे त्यांनी लिहिलेले पुस्तक बेस्ट सेलर ठरले. राष्ट्रपतीपदावरून निवृत्त झाल्यावर डॉ. कलाम विविध संस्थांमध्ये जाऊन व्याख्याने देत असत. २७ जुलै २०१५ रोजी तरुणांना व्याख्यान देत असतानाच त्यांचे दुर्दैवी निधन झाले. त्यांच्या आकाली निधनाने भारताच्या वैज्ञानिक क्षेत्रात जी पोकळी निर्माण झाली ती कधीही भरून निघणार नाही. डॉ ए.पी. जे अब्दुल कलाम यांना पुण्यतिथीनिमित्ताने विनम्र अभिवादन!

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -32, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद 431 005 (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. 205, 13 वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - 2, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. ( * पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
TITLE CODE -MAHMAR51117, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +91 90757 16739

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
TITLE CODE -MAHMAR51117, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# समाधान तिथे सुख...!!



रुपाली वागरे/वैद्य
संपर्क क्र. 9860276241

आधुनिक केसरी

**सूख, समाधान कश्यात शोधायच हे आपण ठरवायच असतं. मोठी-मोठी घरं, महागाड्या गाड्या,चैनीच्या वस्तू सर्व काही आपल्याजवळ असलं तरी...समाधान आपल्याजवळ नसतं, पैशाने श्रीमंत असलो तरी आपण गरीबच ठरतो... नाही का? दिलखुलासपणे जगा, आयुष्याला सकारात्मकतेने पाहा. तुम्ही किती जगता यापेक्षा कसं जगता याला जास्त महत्व आहे. ज्याला हाव अधिक तो तेवढाच गरीब आणि ज्याला आहे त्यात समाधान त्यांच्याएवढा श्रीमंत कुणीच नाही! समाधान तेथे सूख, हे शुद्ध तत्त्वज्ञान मला अफरीन कडून समजल.**

सकाळी यांना बॅंगलोर एक्सप्रेससाठी रेल्वेस्टेशनला सोडले, वापस येतांना रिमझिम पाऊस चालू होता. सकाळी साडे पाचची वेळ, मंद धुंद करणार मस्त वातावरण. रस्ते पाण्याने भरलेले. स्टेडिअमच्या रस्त्याने जाताना एक दृश्य नजरेस पडल आणि, अक्षरक्षा अंगावर काटा आला. आणि क्षणभर थांबले. रत्याच्याबाजूला पाल टाकून एक कुटुंब पावसापासून आपलं संरक्षण करत होतं. रस्त्यावर पाणी, त्यावर घोंघवणारी मच्छर, नालीची घाण वाहून इथ जमा झालेली, त्याचा कीळसवाना उग्र वास! आणि त्याच्याच बाजूला कळकट घोंगडी अंगावर घेऊन एवढीशी चिमूरडी चूलीजवळ चहाच्या प्रतिक्षेत बसली होती...गरमागरम वाफाळलेला चहा, सोबत रात्रीच्या भाकरीचे तूकडे तिच्या आईने तिच्या समोर ठेवले. काळा चहा...ओ अम्मा जरा दुध तो डालती इसमें, सारा दुध क्या भैया को पिला दोगी...डाल थोडा इसमे, दुधाचा छोटा पुडा... तिच्या आईने हातात गच्च धरुन ठेवला, तेरे बापू को आज दुध के साथ रोटी खाने दे बेटा... दिनभर काम करता है, हमारे वास्ते... अच्छा जी अम्मा...ठीक है. म्हणत तिने समोर ठेवलेल्या चहासोबत भाकरी बूडवून खाल्ली...चेहऱ्यावर प्रसन्नता, किती समाधान ओंसडून वाहात होत. खूप कौतुक वाटलं त्या चिमूरडीच... परिस्थीतीची जाणीव एवढ्या कोवळ्या वयात. न राहावून मी तिच्या हातात पन्नासची नोट ठेवली, तर तिने ती घेण्यास नकार दिला, म्हणाली दिदी अम्मा गुस्सा करेगी आप जाने के बाद, मैं ये नही रख सकती...ले लो वापीस, अरे ठेव ना बिस्कीट घेऊन खा त्याचे. नको दिदी, नही होना मुझको म्हणत तिने पन्नास रुपये वापस दिले, तिचं नाव अफरीन... वय वर्ष दहा ते बारा, शिक्षणाचा गंध नाही. रोज राहाण्याच ठिकाण बदलणार, आज इथे तर उद्या तिथे... खाण्याचे वांदे, तरीपण ओठावर एक मोहक हास्य, कुठलही भविष्य नसतांना जगण्याची आशा. माझ्याकडे पाहात डोळे मिचकावत म्हणाली. अजी रुक गई बरसात अब जाओ जल्दी... गाडीच्या डीक्कीमध्ये काल स्वरालीचे चिप्सचे काही पुडे होते, काही पैसै आणि ते पूडे तिच्या हातावर जबरदस्ती ठेवले. तिने तिच्या अम्माकडे पाहिले... त्यांनी मानेने होकार दिला आणि अफरीनने ते घेऊन त्या घोंगडीत गुंडाळले, बापू खाकर बहोत खुश होंगे दिदी ,उन्हें बहोत पसंद है ये आलू वाले चिप्स. आज हम हैद्राबाद जाने वाले है, अम्मा के मामा के घर... और हम वहिच रहनेवाले है, मैं वाहांपे स्कूल जाऊंगी, बहोत मन लगाकर पढुंगी, बहोत बडी होकर बापू को काम नही करने दुंगी. ती बडबड करत होती, अठराविश्व दारिद्रयात राहून कीती मोठ स्वप्न ती पाहात होती...आणि आपली मूलं यांच्यापुढ्यात एवढ सुख समाधान असताना त्यांच्या चेहऱ्यावर समाधान कधीच नसत! क्षणभर तिचा मला हेवा वाटला... एका पिशवीतून कागदाच्या होड्या काढून तिने माझ्या हातात दिल्या, इनमेंसे कोनसी बी एक लेलो. मैने बनाई है खेलने के लिए. तिच्या हातातील गुलाबी रंगाची होडी घेतली...समोर साचलेल्या पाण्यात सोडली, तशी अफरीन आनंदाने उड्या मारू लागली. खरचं... सूख, समाधान कश्यात शोधायच हे आपण ठरवायच असतं. मोठी-मोठी घरं, महागाड्या गाड्या,चैनीच्या वस्तू सर्व काही आपल्याजवळ असलं तरी... समाधान आपल्याजवळ नसत, पैशाने श्रीमंत असलो तरी आपण त्यांच्यापूढे गरीबच ठरतो...नाही का?

दिलखुलासपणे जगा, आयुष्याला सकारात्मकतेने पाहा. तुम्ही किती जगता यापेक्षा कसं जगता याला जास्त महत्व आहे. ज्याला हाव अधिक तो तेवढाच गरीब आणि ज्याला आहे त्यात समाधान त्यांच्याएवढा श्रीमंत कुणीच नाही! समाधान तेथे सूख, हे शुद्ध तत्त्वज्ञान मला अफरीन कडून समजल.

# ।। आला श्रावण... दरवळे भक्तिचा सुगंध ।।



दिलीप देशपांडे
मो.नं. ८९९९५६६९१७

आधुनिक केसरी

**श्रावण हा सणांचा राजा मानला जातो. श्रावणातील प्रत्येक दिवसाचे महत्त्व वेगवेगळे आहे. वातावरण भक्तिमय झालेले असते. भक्तिचा सुगंध दरवळत असतो. श्रावणाच्या सुरुवातीला जिवतीचा कागद देवघराजवळ चिकटवून दर शुक्रवारी त्याचे पूजन आरती करायची जुनी परंपरा आपल्याकडे आहे. आपल्या अपत्यांच रक्षण व्हावं ही त्यामागील भावना आहे. श्रावणात शिवपूजनालाही खूप महत्त्व आहे.शक्य होईल तसे जोतिर्लिंगाचे दर्शन घेतात. त्र्यंबकेश्वर, घृष्णेश्वर, औंढा नागनाथ, परळी वैजनाथ, भीमाशंकर या ठिकाणी भाविकांची दर्शनासाठी गर्दी असते.**

श्रावण महिन्यात निसर्गाने आपले रूप बदललेले असते. श्रावण सरी कोसळतात. पाऊसही क्षणात येतो क्षणात जातो. सर्वदूर हिरवे गवताचे गालिचे पसरले असतात. म्हणूनच कवितेत वर्णन केले आहे..

हिरवे हिरवे गार गालिचे हरित तृणाच्या मखमलीचे.....
किंवा
श्रावण मासी हर्ष मानसी, हिरवळ दाटे चोहीकडे
क्षणात येते सर सर शिरवे,क्षणात फिरुनी उन पडे..

श्रावण हा सणांचा राजा मानला जातो. श्रावणातील प्रत्येक दिवसाचे महत्त्व वेगवेगळे आहे. वातावरण भक्तिमय झालेले असते. भक्तिचा सुगंध दरवळत असतो. श्रावणाच्या सुरुवातीला जिवतीचा कागद देवघराजवळ चिकटवून दर शुक्रवारी त्याचे पूजन आरती करायची जुनी परंपरा आपल्याकडे आहे.

आपल्या अपत्यांच रक्षण व्हावं ही त्यामागील भावना आहे. श्रावणात शिवपूजनालाही खूप महत्त्व आहे.शक्य होईल तसे जोतिर्लिंगाचे दर्शन घेतात. त्र्यंबकेश्वर, घृष्णेश्वर, औंढा नागनाथ, परळी वैजनाथ, भीमाशंकर या ठिकाणी भाविकांची दर्शनासाठी गर्दी असते.

अनेक ठिकाणी,मंदिरात, किंवा घरी,रुद्रपाठ करतात. श्रावणी सोमवार, मंगळागौर, जिवतीची पूजा, नृसिंह पूजन,जन्माष्टमी,(गोकुळाष्टमी)राखी पौर्णिमा, नारळीपौर्णिमा,बैल पोळा, या प्रमाणे श्रावणातील सण-उत्सवही मोठ्या प्रमाणात साजरे केले जातात.

नवविवाहित स्त्रियांनी श्रावणातील प्रत्येक मंगळवारी करावयाचे सौभाग्यदायी मंगळागौरी ह्या देवतेचे एक व्रत. या व्रतात शिव आणि गणपतीसह गौरीची पूजा करतात. लग्नानंतर पहिली पाच वर्षे किंवा सात वर्षे हे व्रत पाळल्यानंतर या व्रताचे उद्यापन करतात.

सुवासिनी स्त्री श्रावणातल्या मंगळवारी आपल्या विवाहित मैत्रिणींसह शिवासमवेत असलेल्या गौरीची पूजा करतात.

पहिल्या वर्षी माहेरी हे व्रत करण्याची प्रथा आहे. हे व्रत विशेषतः महाराष्ट्रीय ब्राह्मण स्त्री वर्गात विशेषतः केले जाते. विवाहितमैत्रिणी एकत्र जमून मंगळागौर रात्रभर जागवितात. निरनिराळे खेळ, गाणी, उखाणे इत्यादींनी मजेत दिवस व रात्र घालवितात व दुसरे दिवशी पहाटे पूजा-आरती करून सांगता करतात.

हे व्रत सौभाग्यवती स्त्रियांकरिता आहे. 'जय जय मंगळगौरी' म्हणून सोळा वातींची मंगल आरती भक्तिभावाने करतात ,आणि नंतर हातात तांदूळ घेऊन बसतात व मंगळागौरीची कहाणी ऐकतात. ती कहाणी तात्पर्याने अशी : सुशीला नावाच्या एका साध्वीस मंगळागौरी प्रसन्न झाली व पुढे तिला वैधव्य प्राप्त झाले असताना मंगळागौरीने यमदूतांशी युद्ध करून तिच्या पतीचे प्राण परत आणले आणि तिला अखंड सौभाग्यवती केले. मंगळागौरीच्या भक्तिपूर्वक केलेल्या पूजेचे हे फल होय. ही कहाणी ऐकल्यावर सुवासिनी हातातील तांदूळ देवीला वाहतात. दुपारी मौन आचरून भोजन करतात. पाच अथवा सात व्रते केल्यावर उद्यापन करतात.

नागपंचमी हा श्रावण महिन्यातील सण आहे.या दिवशी घरोघरी नागाची पूजा करून नागदेवतेला प्रसन्न करण्याची पद्धत आहे.कालिया नागाचा पराभव करून यमुना नदीच्या पात्रातून भगवान श्रीकृष्ण सुरक्षित वर आले तो दिवस श्रावण शुद्ध पंचमीचा होता. त्या दिवसापासून नागपूजा प्रचारात आली असे मानले जाते.

एका शेतकऱ्याच्या नांगराच्या फाळाने नागिणीची तीन पिल्ले मृत्युमुखी पडली व त्यामुळे नागदेवतेचा कोप झाला अशीही समजूत प्रचलित आहे. त्यामुळे या दिवशी शेतकरी आपल्या शेतात नांगरत नाही. कोणीही खणत नाही, घरी कोणीही भाज्या चिरायच्या नाही, तवा वापरायचा नाही व कुटायचे नाही असे काही नियम पालन करण्याची प्रथा आहे. श्रद्धाळू माणसे नागदेवतेची पूजा करून तिला दूध-लाह्यांचा व गव्हाच्या खिरीचा नैवेद्य दाखवतात व आपले संरक्षण कर अशी प्रार्थना करतात.

अनंत (म्हणजेच शेष), वासुकी, पद्मनाभ, कम्बल, शंखपाल, धृतराष्ट्र, तक्षक आणि कालिया या आठ नागांची या दिवशी पूजा केली जाते.

नागपंचमीच्या दिवशी नागाची पूजा करताना महिला या दिवशी महिला घराची स्वच्छता करतात. जमिनी शेणाने सारवितात. अंगणात रांगोळी काढतात. नागाची चित्रे भिंतीवर काढतात आणि त्याची पूजा करतात. काही ठिकाणी नागाच्या वारुळापाशी महिला गाणी म्हणत जातात आणि वारुळाची पूजा करतात. भारताच्या काही प्रांतात नागपंचमीला जिवंत नागाची पूजा होते दूध- लाह्य ह्या माणसाच्या आवडीच्या गोष्टी नागांना दिल्या जातात, पण ते त्यांचे अन्न नाही हे लक्षात ठेवले पाहिजे.

पुणे - बेंगलोर महामार्गावर कोल्हापूरकडे जाताना, पेठ नाका (इस्लामपूर)पासून उजव्या बाजूला एक फाटा फुटतो. तेथून साधारण २० कि.मी वर बत्तीस शिराळा गाव आहे. सांगली जिल्हातील हा निसर्गसमृद्ध भाग आहे. बत्तीस शिराळ्यापासून जवळच चांदोली अभयारण्य, चांदोली धरण आहेत.

जेव्हा पूर्वी नागपंचमीचा हा उत्सव शिराळ्यात मोठ्या प्रमाणात साजरा केला जायचा .

नागपंचमीच्या दिवशी शिराळा गावात ग्रामदेवतेची पूजा करून साधारणपणे १००-१२५ नागांची एकाच वेळी मिरवणूक काढली जाई. त्यानंतर नागाचे खेळ आयोजित होत. सर्वात उंच फणा काढणारा नाग, सर्वात लांब नाग अशा पकडलेल्या मंडळांना बक्षिसे मिळत. नागपंचमीस नागाचे खेळ पाहण्यासाठी हजारो नागरिक येत. यांतील आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे २ वर्षाच्या बालकापासून ते वयस्कर माणसांपर्यंत सर्वजण न घाबरता गळ्यात नाग घालून फोटो काढत. शिराळ्याची नागपंचमी पूर्वी देशातच नव्हे तर परदेशांतही प्रसिद्ध होती. नागपंचमीसाठी पूर्वी लाखो लोक जमायचे. परंतु, सापांचे होणारे हाल पाहून येथील निसर्ग व वन्यजीवप्रेमींनी थेट मुंबई हायकोर्टात धाव घेतली. कोर्टाने वन्य जीव संरक्षण कायद्यानुसार २००२ मध्ये आदेश देऊन सापांना पकडणे, त्यांचा खेळ करणे तसेच मिरवणूक काढणे, प्रदर्शन करणे, त्यांच्या स्पर्धा भरवणे यांना बंदी केली. तसेच या आदेशाचे तंतोतंत पालन करण्याची जबाबदारी जिल्हा प्रशासन, जिल्हा कोर्ट, वन खाते आणि पोलिसांवर सोपविली.



त्यामुळे काही वर्षांपासून बत्तीस शिराळ्यात फक्त प्रतीकात्मक मिरवणूक काढली जाते.

हिंदू पंचांगाप्रमाणे श्रावणात येणारी राखी पौर्णिमा ही नारळी पौर्णिमेच्या दिवशी किंवा पौर्णिमा लागोपाठ दोन दिवस असेल तर दुसऱ्या दिवशी असणाऱ्या पौर्णिमेला साजरी करतात. याच दिवसाला'रक्षाबंधन' म्हणतात. या दिवशी रक्षाबंधनाचा कार्यक्रम असतो.हा सण बहीण भावाच्या अतूट, उत्कट प्रेमाची आठवण करून देणारा दिवस आहे. श्रावण पोर्णिमेस राखी बांधावी, उत्कर्ष व्हावा, आपल्या भावाने आपले रक्षण करावे, ही यामागची मंगल मनोकामना असते.

नारळी पौर्णिमा हा सण समुद्रकाठी राहणाऱ्या व प्रामुख्याने मासेमारी करणाऱ्या मुख्य कोळी लोकांचा सण आहे. पावसाळ्यात समुद्र प्रचंड खवळलेला असतो. बोटी जहाजांची वर्दळ या काळात बंद असते. समुद्राचा कोप होऊ नये, जहाजे, नौका सुरक्षित रहाव्यात, समुद्र शांत होण्यासाठी कोळी लोक समुद्राला नारळ अर्पण करतात. महाराष्ट्राला ७२० किलोमीटर लांबीचा अखंड समुद्रकिनारा लाभलेला आहे. या ठिकाणी राहणाऱ्या कोळी लोकांचे उपजीविकेचे प्रमुख साधन किंवा व्यवसाय हा मासेमारी आहे. ते लोक श्रावणी पौर्णिमेला नारळी पौर्णिमा असे म्हणतात.

नारळी पौर्णिमेच्या काही दिवस अगोदर कोळी बांधवांनी समुद्रात जाणे बंद केलं असते.

पावसाळ्यात समुद्रामध्ये मासेमारीसाठी उतरणारे कोळी लोकांना समुद्रापासून धोका असतो. त्यामुळे श्रावणी पौर्णिमेनंतर पावसाचा जोर थोडा कमी झालेला असतो. समुद्र हे वरून देवतेच्या वास्तव्याचे ठिकाण मानले जाते. समुद्राची कृपा कोळी लोकांवर रहावी. म्हणून रीतसर पूजा करून वाजत-गाजत सोन्याचा नारळ अर्पण करतात.

अशा प्रकारे नारळाची पूजा म्हणजेच निसर्गाची पूजा अर्थात वृक्षवल्ली, आम्हा सोयरे ! जलदेवतेला प्रसन्न करण्यासाठी नारळी पौर्णिमा हा सण साजरा केला जातो .

गोकुळाष्टमी हा श्रावण महिन्यात येणारा सर्व बालगोपाळांचा आणि गोविंदांचा आवडीचा सण आहे. कृष्ण जन्माच्या या दिवसाला श्रीकृष्ण जयंती, दहीहंडी, श्रीकृष्ण जन्माष्टमी असेही म्हणतात. या दिवशी भगवान श्रीकृष्णांचा जन्म मोठ्या उत्साहात आणि आनंदात संपूर्ण भारतात साजरा केला जातो. श्रीकृष्णाचा जन्म श्रावण वद्य अष्टमीस मध्यरात्री, रोहिणी नक्षत्रावर चंद्र वृषभ राशीत असताना झाला. म्हणूनच या दिवशी गौळणींचा लाडका कान्हा श्रीकृष्ण याचा जन्मोत्सव साजरा करण्याची प्रथा आहे.

कृष्ण हे भगवान विष्णूचे आठवे अवतार आहेत असे पुराणात वर्णन आहे. तसेच भगवान श्रीकृष्ण हे वासुदेव आणि देवकीचे आठवे पुत्र होते. यादिवशी बरेचजण गोकुळाष्टमीचा उपवास करतात.

सगळीकडेच यादिवशी लहान मुलांपासून ते मोठ्या माणसांपर्यंत सर्वचजण 'आला रे आला गोविंदा आला' असा जयघोष करत असतात. दहीहांडी म्हटलं की, आपल्या सर्वांच्याच डोळ्यासमोर दिसतात त्या उंचच उंच दहीहंड्या आणि ती फोडण्यासाठी उभे असणारे गोविंदा.

भगवान श्रीकृष्णांना दही, दूध, लोणी हे पदार्थ खूप आवडत असे. श्रीकृष्ण हे चोरून दही खात असे त्यामुळेच कृष्णाला माखन चोर असेही म्हणतात. दही,दूध, लोणी आणि लाह्या हे सगळे एकत्र करून बनवलेला पदार्थ म्हणजे काला. श्रीकृष्ण गायी चरताना स्वतःची व सवंगड्यांची शिदोरी एकत्र करून ते सर्व खाद्यपदार्थ एकत्र करून त्याचा काला करत असे आणि आपल्या सवंगड्यांसह खात असे. या कथेला अनुसरून गोकुळाष्टमीच्या दुसऱ्या दिवशी गोपाळकाला साजरा करतात. गोपाळकाल्याच्या दिवशी दही, दूध, लोणी आणि लाह्या, पोहे,दाणे,लोणचे,मीठ, यांचा काला "गोपाळकाला' करून प्रसाद म्हणून सर्वांना वाटतात.तसेच पंजिरी-(धनापावडर,गुळ,खोबर ,सुंठ,खडीसाखर.)

यांच दिवशी दही दुधाने भरलेली हंडी उंच बांधून ही दहीहंडी सर्व गोविंदा एकत्र येऊन फोडतात.. आपल्या या भारतीय संस्कृतीमध्ये गोकुळाष्टमीला एक अनन्यसाधारण महत्व आहे. वृंदावन, मथुरा, गोकुळ, द्वारका या ठिकाणी तर हा सण खूप मोठ्या प्रमाणात साजरा केला जातो. कारण याच ठिकाणी भगवान श्रीकृष्णांचे जन्मस्थान असल्यामुळे तिथे मोठ्या उत्साहात गोकुळाष्टमी साजरी होते.

हिंदू लोक श्रीकृष्ण जन्माष्टमीच्या दिवशी उपवास करतात. यादिवशी श्रीकृष्णाची पूजा करतात, रात्री उशिरापर्यंत जागतात आणि श्रीकृष्ण जन्माच्या वेळेला रात्री १२ वाजता प्रार्थना, पूजा करतात. कृष्णाच्या लहानपणीचा फोटो किंवा मूर्ती पाळण्यात ठेवतात. आत्ताच्या या आधुनिक आणि तंत्रज्ञानप्रिय जगात गोकुळाष्टमी साजरी करताना,

दहीहंडी जास्त उंच न बांधता, खाली बांधून तिचा आनंद घ्यावा.जर उंच बांधली असेल तर संरक्षणासाठी उपाययोजना कराव्यात आणि मगच या दहीहंडी फोडण्याच्या स्पर्धा आयोजित कराव्यात. कारण दरवर्षी बऱ्याच गोविंदांना यामध्ये आपला जीव गमवावा लागतो.नाचगाण्याचे बीभत्स कार्यक्रमास स्थान नसावे.

पोळा किंवा बैलपोळा हा श्रावण अमावस्येला बैलाची कृतज्ञता व्यक्त करणारा हा एक मराठी सण असून हा विशेषतः विदर्भात,खांदेशात, भव्य पातळीवर साजरा केला जातो, ज्यांच्याकडे शेती नाही ते मातीच्या बैलाची पूजा करतात.नागपंचमी, नारळी पौर्णिमा, रक्षाबंधन, गोकुळाष्टमी या सणांबरोबरच सरत्या श्रावणात पिठोरी अमावस्येला संपूर्ण महाराष्ट्रात साजरा केला जातो असा सर्जा-राजाचा सण म्हणजे 'पोळा. ज्या दिवशी बैलांकडून कुठलेही कामकाज केले जात नाही त्याच्या मानेवर जू ठेवली जात नाही. असा हा व्रत वैकल्याचा सणांचा, आनंददायी, उत्सवाचा आणि उत्साहाचा श्रावण मास कसा संपतो समजतही नाही. गेल्या दोन वर्षात सणावर कोरोनामुळे निर्बंध आल्यामुळे ते उत्साहात साजरे झाले नव्हते. परंतु आता जरी सणवार साजरे करायचे निर्बंध उठवले असले तरी सुरक्षितेच्या दृष्टीने जे काही नियम घालून दिले जातील ते पाळूनच दहीहंडी पोळा आदी सणवार साजरे करायचे आहे हे लक्षात ठेवणे अतिशय महत्त्वाचे आहे.



# गटार ( Gutter) नव्हे , गताहार !

आधुनिक केसरी

**आपल्या सणांना बदनाम करायचे काम नेहमी केले जाते. आपल्याकडे आषाढी अमावस्यासनंतर आहारात बदल केला जातो. या दिवसाला गताहारी (जो आहार गेला आहे तो) अमावस्या म्हणतात. आपल्या प्रत्येक सणांचे नावे संस्कृतवर आधारित आहेत. Gutter हा इंग्रजी शब्द आपल्या सणाला खोडसाळपणे जोडलेला आहे. आपली लायकी गटारात लोळायची आहे, असे आपल्याला हिणवले गेले व दुर्दैव हे की आपण ते खरे ठरवण्याच्या मागे लागलोय. आपल्या महान संस्कृतीची जाणीव ठेवा. आपल्या प्रत्येक सणाला मोठा अर्थ आहे. आपल्या सणांची बरोबरी कुणीही करू शकत नाही. आपले सण आपणच संस्कृतीने साजरे करूया.**

गटार ( GUTTER ) नव्हे, गताहार, गत=मागील, जुने, गेलेले, आता नाहीं ते, आहार=भोजन, गत+आहार=गताहार जसे : शाक + आहारी = शाकाहारी, तसे : गत + आहारी = गताहारी. गत + आहारी + अमावस्या = गताहारी अमावस्या या दिवशी दीप पुजन केले जाते. ही अमावस्या २७ जुलै बुधवारी रात्री ९-१२ प्रारंभ होईल व गुरुवारी रात्री १.२५ ला समाप्त होईल. म्हनजेच येत्या गुरुवारी २८ जुलै २०२२ रोजी दीप अमावस्या आहे. हिंदूंच्या सर्वाधिक कुचेष्टेचे, विकृत विनोदांचे जे सण आहेत त्यात टपौर्णिमेनंतर दीप अमावस्या हा सण येतो. व्यक्तिगत पातळीवर गटारी साजरी करण्याचा प्रत्येकाला हक्क आहे. पण दीपपूजनाऐवजी केवळ गटारी म्हणून याला सर्वत्र कुप्रसिद्धी मिळू नये असे वाटते. जो आपला सणच नाहीये त्यासाठी आपण आपला धर्म, आपली संस्कृती का म्हणून बदनाम करायची? उलट महाराष्ट्रातील सर्व जातींच्या लाखो घरांमध्ये मोठ्या भक्तिभावाने या दिवशी दीपपूजन केले जाते. त्यामुळे अशी आपलीच बदनामी टाळण्याची मी गेली कित्येक वर्षे माझ्या पातळीवर ही विनंती अनेकांना करीत आहे. हळूहळू याचे चांगले परिणामही दिसू लागले आहेत.

हजारो वर्षांची परंपरा असलेल्या आपल्या धर्मात याच्या मागचे विज्ञानही सामावलेले आहेच. पूर्वी या दिवशी मांसाहार करून गौरींच्या जेवणापर्यंत मांसाहार बंद ठेवला जात असे. प्राण्याच्या शरीरातून जगभर पसरलेला कोरोना लाखोंचे प्राण घेत सुटला आहे. किमान या पावसाळी दिवसांमध्ये मांसाहार बंद ठेवण्याची तीव्र गरज आणि आपली प्रथा किती दूरदर्शीपणे आपल्या पूर्वजांनी योजली आहे हे यावर्षी प्रकर्षाने अधोरेखित होते आहे.

आपण यामागची वैज्ञानिक कारणे जाणून घेऊया

1) या ओलसर पावसाळी वातावरणात मांसाहार नीट पचत नाही.

2) बहुतेक प्राण्यांचा हा काळ म्हणजे विणीचा / प्रजननाचा काळ असतो. याच काळात प्राण्यांची हत्या केली तर नवीन प्राणी जन्मालाच येणार नाहीत. मग वर्षभर खायला प्राणी मिळणार कुठून? याचा साऱ्या निसर्गचक्रावरच विपरीत परिणाम होतो. त्यामुळे निसर्गपुत्र कोळीबांधव या काळात मासेमारी करीत नाहीत आणि सरकारी पातळीवरूनही मासेमारीवर बंदी घालण्यात येते.

3) या दिवसात बाहेरच्या दमट वातावरणामुळे प्राण्यांच्या शरीराच्या आत आणि शरीरावरील त्वचेवर अनेक घातक जीवजंतू असण्याची शक्यता असते.

शिजविताना त्यांचा पूर्ण नाश न झाल्यास त्याचाही खाणाऱ्याला त्रास होऊ शकतो.

4) वातावरणात ओलावा असतो. मांस किंवा मासे नीट न ठेवल्यास ते हवेतील वाढलेल्या जंतूंमुळे कुजण्याची प्रक्रिया अधिक वेगाने होते.

5) आज विविध लसी, अत्यंत परिणामकारक प्रतिजैविके, औषधे उपलब्ध असूनसुद्धा, धुमाकूळ घालणाऱ्या विविध साथींना आवर घालणे कठीण झाले आहे. अनेक घातक रोगांच्या जीवघेण्या साथी, ह्या अस्वच्छ प्राण्यांच्या शरीरावर वाढणाऱ्या जंतुंमुळे पसरतात. म्हणून या दिवसात मांसाहार टाळल्यास जंतू संसर्गाचा धोका कमी होतो.

अशा सर्व कारणांमुळे या दिवसाला धार्मिक जोड दिली गेली आहे. त्यामुळे आपोआपच निसर्गाचा तोल साधला जातो.

या दिवसात शाकाहार करण्यामागेही शास्त्रीय कारणे आहेतच. अत्यंत दुर्मिळ आणि प्रकृतीला पोषक अशा अनेक भाज्या याच काळात उगवतात. संपूर्ण वर्षभरात या भाज्या पुन्हा पाहायलाही मिळत नाहीत. शाकाहार केल्यामुळे अशा भाज्या आपोआपच खाल्ल्या जातात. तुलनेने शाकाहाराचे या दिवसात नीट पचन होते. विविध उपासांच्या दिवशी खाल्ल्या जाणाऱ्या कंदमुळांच्या आहारामुळे त्यातील अनेक दुर्मिळ खनिजे आणि उपयुक्त पोषक घटक अपोआप शरीराला लाभतात. कायम मांसाहार करणाऱ्यांच्या पचन संस्थेवर नेहेमी येणारा ताण, या शाकाहारी बदलामुळे कांही काळ कमी होतो. म्हणून " श्रावण जरूर पाळा, गटारीची कुप्रसिद्धी टाळा "!

सचिन कोरडे
उस्मानाबाद

# मुक्ताईंच्या पावलांनी सजलंय यंदाचं 'रिंगण'



डॉ. जगदीश पाटील
संपर्क क्र. 8149498020

आधुनिक केसरी

**महाराष्ट्राला संतपरंपरेची मोठी देणगी लाभली आहे. प्रत्येक संतांच्या चरित्राचा आणि त्यांच्या साहित्याचा ठेवा हा संपूर्ण जगासाठी एक आदर्श ठरला आहे. याच संतांचे चरित्र तत्कालीन तसेच त्यानंतरच्या लेखक-कवींनी आपापल्या परीने रेखाटलेले दिसून येते. त्यात आणखी नव्याने आणि वेगळा दृष्टिकोन ठेवून भर घालत संत अभ्यासक आणि पत्रकार यांच्या संयुक्त विचारसरणीतून दरवर्षी एकेक संतांचा मागोवा घेण्याचे महत्त्वपूर्ण काम रिंगण हे वार्षिक गेल्या दहा वर्षांपासून करत आहे. रिंगणचे संपादक सचिन परब तर प्रकाशक प्रशांत पेडणेकर व मुक्ता परब आहेत. त्यांनी आपल्या पत्रकारितेचा सदुपयोग करत संतपरंपरेशी आणि संतांच्या अभ्यासाशी निगडित व्यक्तींना एकत्र आणून त्यांच्यामार्फत संतांचा मागोवा घेण्याचे कठीण कार्य रिंगणच्या रूपाने लीलया करून दाखवले आहे. यंदा संत मुक्ताई विशेषांक म्हणून मुख्यमंत्र्यांचे हस्ते पंढरपूर येथे रिंगणचे प्रकाशन झाले.**

रिंगण हा एक वार्षिक अंक आहे. इतर दिवाळी अंकांप्रमाणे महाराष्ट्राचा सगळ्यात मोठा सोहळा असलेल्या आषाढी एकादशीचा अंक पाहिजे, या विचारातून पहिले रिंगण 2012 मध्ये प्रसिद्ध झाले. दरवर्षी आषाढी एकादशीला पंढरपूरच्या विठ्ठल मंदिरात मुख्यमंत्र्यांच्या हस्ते या अंकाचे प्रकाशन होत असते. प्रत्येक अंकात एका संताचा सामाजिक, सांस्कृतिक अंगाने मागोवा असतो. आतापर्यंत नऊ अंक आले असून 2012 मध्ये संत नामदेव, 2014 मध्ये संत चोखामेळा, 2015 मध्ये संत जनाबाई, 2016 मध्ये संत निवृत्तीनाथ, 2017 मध्ये संत विसोबा खेचर, 2018 मध्ये संत गोरा कुंभार, 2019 मध्ये संत सावता माळी, 2020 मध्ये संत सोपानदेव, 2021 मध्ये संत नरहरी सोनार असे विशेषांक प्रकाशित झाले आहेत. यंदा 2022 च्या आषाढी एकादशीला संत मुक्ताबाई विशेषांक प्रकाशित झाला आहे. संतांच्या पाऊलखुणा शोधत महाराष्ट्रभर आणि गरज पडल्यास महाराष्ट्राच्या बाहेर जाऊन शोध घेत लिहिलेले लेखन हे रिंगणचे वैशिष्ट्य आहे. त्यातून संत साहित्याच्या अभ्यासाची नवी शैली विकसित झाली आहे. रिंगणचे आतापर्यंतचे सर्वच अंक पाहिल्यावर सर्वांनाच आपलीशी वाटेल अशी सुलभ भाषा त्यात वापरली असल्याचे निदर्शनास येते.

सचिन परब यांनी मुक्ता या संपादकीय लेखनात मुक्ताईंचे महत्त्व प्रतिपादन केले असून गुरू-शिष्याच्या, भावा-बहिणीच्या पलीकडचे नाते चारही भावंडात असल्याचे सांगितले आहे. संत नामदेव महाराज यांनी लिहिलेल्या समाधी प्रकरणात चारही भावंडांचा शेवट विषण्ण करणारा आहे. मुक्ताईंच्या ताटीच्या अभंगातून वारकऱ्यांना जगण्याचे रोकडे तत्त्वज्ञान मिळाल्याचेही त्यांनी नमूद केले आहे. संत नामदेव महाराज यांनी म्हटल्याप्रमाणे मुक्ताई तापीतीरी गुप्त झाल्या आहेत. यासंदर्भात संपादक म्हणून सचिन परब म्हणतात की, तापीच्या तीरावर मुक्ताई नेमक्या कुठे अंतर्धान पावल्या हे नामदेवरायांनाही कळले नाही. त्यामुळे त्यांचे स्मृतिस्थळ इतर संतांच्या समाधीसारखे दाखवता येत नाही. एकमेकांपासून जवळच असणाऱ्या कोथळी आणि मेहूण या दोन संस्थानांनी आपलेच ठिकाण खरे असल्याचे दावे केले आहेत, तसे ते पुरावेही सांगतात. परंतु रिंगणला या वादात पडायची इच्छा नाही. दोन्ही मुक्ताईंसमोर सारख्याच श्रद्धेने नतमस्तक होणाऱ्या सामान्य वारकऱ्यासारखी रिंगणची भूमिका आहे. रिंगणच्या मित्रांनी दोन्ही ठिकाणचे घेतलेले अनुभव जसेच्या तसे रिंगणमध्ये दिले असल्याचेही त्यांनी नमूद केले आहे.

अमृता मोरे यांनी मुक्ताई तेव्हा प्रकट झाल्या या लेखात मुक्ताईनगर येथील हायवेजवळची मुक्ताई आणि कोथळी येथील मुक्ताई या दोन्ही ठिकाणच्या मंदिराचे वर्णन केले असून तिथून मिळालेल्या माहितीच्या आधारे आपल्या लेखात मुक्ताईंचे सर्वांगसुंदर वर्णन केले आहे. अभय जगताप यांनी तापीतीर या लेखात तापीतीरी असणाऱ्या मेहूण येथील मंदिर भेटीप्रसंगीचे वर्णन केले आहे. तापी नदीपात्रातील मंदिर, सोमेश्वराचे मंदिर, तिथे उपस्थित असणाऱ्या महाराजांकडून आणि परिसरातील गावकऱ्यांकडून मिळालेली माहिती तसेच मेहूण मंदिराचा शोध लावणाऱ्या रामभाऊ टोपडे यांची भुसावळ येथील राजगोंड विठ्ठल मंदिरात असलेली समाधी याचे सुंदर वर्णन केले आहे. सोबतच पुरातन चांगदेव मंदिराचा व तेथील परिसराचा उल्लेख व शिलालेख यांचीही माहिती लेखात दिलेली आहे. विशेष म्हणजे वरील दोन्ही लेख सदरील लेखकांनी प्रत्यक्ष भेट देऊन त्यांना आलेले अनुभव आणि मिळालेली माहिती जशीच्या तशी दिली आहे. त्यामुळे आपण प्रत्यक्ष त्या स्थळाला भेट देत आहोत, अशी अनुभूती वाचकांना येत राहते.

स्वामीराज भिसे यांनी क्रांतीचा वारसा या लेखात आळंदीत भेटलेल्या मुक्ताईंचे वर्णन केले आहे. ज्ञानेश्वर बंडगर यांनी वक्तेबाबांची गोष्ट या लेखात पंढरपूर येथील मुक्ताई मठात राहिलेल्या निवृत्ती महाराज वक्ते यांचे अनुभव कथन केले आहे. ओंकार पाटील यांनी नंदादीप या लेखात संत मुक्ताई पैठणला शुद्धिपत्र मिळवण्यासाठी व ज्ञानदेव आणि सोपानदेवांच्या समाधीनंतर आल्याचे नमूद केले असून त्या संदर्भातील पैठण व आपेगाव भेटीचा उल्लेख केला आहे. रेणुका कल्पना यांनी सखी या लेखात सासवड येथे भेट देऊन सोपानदेव समाधी घेत असताना मुक्ताई बाजूलाच उभ्या होत्या असे आजही प्रत्यक्ष त्याठिकाणी जाणवत असल्याचे नमूद केले आहे. हर्षदा परब यांनी मुक्त आदिशक्ती या लेखात त्र्यंबकेश्वर येथे भेट देऊन मोठे बंधू निवृत्तीनाथ यांच्या समाधी मंदिरात मुक्ताईंची मूर्ती आणि निवृत्तीनाथ व मुक्ताई या बहीणभावंडातील लाडके नाते, तसेच मुक्ताई गुप्त झाल्या त्यावेळी निवृत्तीनाथ यांना झालेले अपार कष्ट आणि त्यानंतर त्यांनी घेतलेली समाधी याचे वर्णन आले आहे.

प्रशांत जाधव यांनी सोवळा सोहळा या लेखातून जळगाव येथील जुन्या श्रीराम मंदिरातून गेल्या दीडशे वर्षापासून सुरू असलेला संत मुक्ताईंच्या पादुकांचा पंढरपूर पालखी सोहळा वर्णन केला आहे. सोबतच बहिणाबाई यांनी मुक्ताईंचे केलेले वर्णन कवितेच्या रूपाने रिंगणमध्ये दिलेले आहे. प्रदीप म्हैसने यांनी दिंडीसोहळे सुखसोहळे या लेखातून वऱ्हाड प्रांताच्या वेगवेगळ्या गावातून कितीतरी दिंडीसोहळे मुक्ताईंच्या दिशेने महाशिवरात्री व पुण्यतिथीच्या सोहळ्यासाठी येतात, याचे वर्णन करून इलोरा येथील मुक्ताईंच्या मूर्तीचे, मंदिराचे वर्णन केले आहे. बाबुराव महाराज मेहूणकर यांनी दाभा येथे आदिशक्ती शिवनाभी मुक्ताई तत्त्वज्ञान पिठाची स्थापना केल्याचेही त्यांनी म्हटले आहे. निलेश बने यांनी नकाशातल्या रेषांपासून मुक्त या लेखात मुक्ताईंचा प्रभाव महाराष्ट्राच्या सीमा ओलांडून मध्यप्रदेशातही आढळत असल्याचे सांगून दापोरा गावातील मुक्ताई मंदिराचा उल्लेख केला आहे. मुक्ताईंना आईसाहेब म्हणून त्यांची प्रतिमा कित्येकांच्या घरात असल्याचे त्यांनी नमूद केले आहे. प्रवीण शिंदे यांनी सोळूचा सोहळा या लेखात आळंदीपासून सात किलोमीटर असणाऱ्या सोळू गावाचा इतिहास सांगितला आहे. अतुल कुलकर्णी यांनी बीडमध्ये आजोबा भेट या लेखात संत मुक्ताई यांचे वडील विठ्ठलपंत आणि विठ्ठलपंतांचे वडील गोविंदपंत हे देवगिरीच्या यादव राजाकडे सेनापती होते. त्यांनी बीड शहरात बिंदुसरा नदीच्या काठावर समाधी घेतली. या बीड शहरात मुक्ताईंची पालखी आल्यानंतर आजोबांची भेट होत असल्याचे लेखात नमूद केले आहे. चंद्रसेन देशमुख यांनी मंगल मुक्ताई या लेखात उस्मानाबाद येथील मंगलताई हुजरे यांना एकाएकी आयुष्य कंठत असताना संत मुक्ताईंची सोबत हवीहवीशी वाटू लागल्याने घरीच मुक्ताईंचे देऊळ उभे केल्याचा अनुभव कथन केला आहे. रवींद्र मालुसरे यांनी मायानगरीत या लेखात मुंबई येथे आढळणाऱ्या संत मुक्ताई रुग्णालय, संत मुक्ताई रस्ता व इतर ठिकाणी असलेल्या संत मुक्ताई यांच्या नामासंदर्भातील खुणा सांगितल्या आहेत. सूरज करे यांनी सोलापुरात मुक्ताई या लेखात अनंतबापू इंगळे यांनी मुक्ताई माऊलींच्या मंदिराची निर्मिती कशी झाली याचा अनुभव कथन केला आहे. भास्कर हांडे यांनी मुक्तछंदातली माऊली या लेखात रिंगणच्या मुखपृष्ठावर रेखाटलेल्या मुक्ताईंच्या चित्राचे रेखाटन करताना तिच्या विचार उंचीच्या रेषा मुक्तछंदाच्याच रंगात रंगवाव्या लागल्या असल्याचे म्हटले आहे. डॉ. सदानंद मोरे यांनी ताटी उघडा ज्ञानेश्वरा या लेखात भारतीय परंपरेत संत मुक्ताबाईंनी पहिल्यांदा संतत्त्वाची व्याख्या केली. मुक्ताईंमुळे आपणास ज्ञानदेवांचा लाभ झाला. त्यामुळे त्यांचे आपल्यावर अनंत उपकार असल्याचेही नमूद करून मुक्ताईंनी आपल्या ज्ञानेश्वरदादांना प्रेमाची विनवणी करून ताटी उघडा ज्ञानेश्वरा असे म्हटल्यामुळेच ज्ञानेश्वर महाराज ताटीबाहेर आले, असेही नमूद केले आहे. डॉ. रूपाली शिंदे यांनी आदिमाय या लेखात आदिम मातृत्त्वाचे स्त्रीरूप म्हणजे मुक्ताबाई असे कथन करून




मुक्ताईंचे वर्णन केले आहे. रंगनाथ तिवारी यांनी कृष्णविवर या लेखात मुक्ताईंची रचना ही कृष्णविवरासारखी असल्याचे सांगितले आहे. देवदत्त परूळेकर यांनी चिद्वीलासाचे समतासूत्र या लेखात संत मुक्ताई यांनी ताटीच्या अभंगांत चिद्विलासाचे सूतोवाच करून समतेचे मूलतत्त्व जोपासले असल्याचे नमूद केले आहे. दिनकरशास्त्री भुकेले यांनी मोक्षपदे तुच्छ केली या लेखात मुक्ती हे केवळ मुक्ताईंचे नाव नाही तर भारतीय संस्कृतीला ग्रासून दशांगुळे उरलेली संकल्पना आहे. परंतु संतांना मुक्तीचे म्हणजे मोक्षाचे कौतुक नसल्याचे नमूद केले आहे.

डॉ. श्यामसुंदर मिरजकर यांनी सणकांडी या लेखात संत नामदेव यांच्या भेटीचा प्रसंग वर्णन केला असून तुमचे मडके कच्चे राहिले असे बारा-तेरा वर्षाची मुक्ताई आपल्या वयाने ज्येष्ठ असलेल्या संत नामदेव महाराज यांना थेट म्हणू शकते. यावरून मुक्ताईंनी स्वतःचा अधिकार सिद्ध करून आपली ऋजुता जोपासली आहे, असे म्हटले आहे. डॉ. शिवाजीराव मोहिते यांनी अभंगाशय या लेखात मुक्ताईंच्या अभंगातून परमार्थिक अधिकार, विश्वव्यापक भूमिका, योगानुभूती अशा गोष्टी हाती लागत असल्या तरी संवादातील उंची ही त्यांची ताकद होती असे नमूद केले आहे. डॉ. ओमश्रीश दत्तोपासक यांनी संवादबोध या लेखात ज्ञानबोध हा ग्रंथ तात्त्विक असूनही आत्मीय असल्याचे नमूद केले असून त्यात निवृत्तीनाथ आणि मुक्ताई या भावंडांच्या नात्याचा गहिरा पदर समोर येत असल्याचे वर्णन केले आहे. डॉ. तुळशीराम गुट्टे यांनी अभंग सनद या लेखात शिकण्याची गहिरी आस असलेल्या मुक्ताईंचा सहज स्वभाव वर्णन केला आहे. प्रतिभा औटी-पंडित यांनी मुक्तीचा पाठ या लेखात मुक्ताईंच्या हरिपाठाचे वर्णन केले असून मोजक्याच अभंगात मुक्तीचे नेमके सूत्र गुंफले असून तेच वापरून मुक्ताई मुक्त झाल्याचे सांगितले आहे. सी.एस. पाटील यांनी मुक्त आणि श्रेष्ठ या लेखात बहुतेक संतांनी आपल्या अभंगातून मुक्ताईंचा गुणगौरव केला असून त्यातून मुक्ताईंचे श्रेष्ठत्व ठळकपणे अधोरेखित केले असल्याचे नमूद केले आहे. अविनाश गोसावी यांनी तैसी मुक्ताबाई आम्हांमध्ये या लेखातून मुक्ताईंची कृती फक्त तिच्या भावंडांपुरतीच मर्यादित नसून चौघांनी भागवत धर्माची पताका आपल्या खांद्यावर घेतली असल्याचे नमूद केले आहे. तसेच त्यांची भाषा भक्तीरसात भिजून गेल्याचेही सांगितले आहे. विवेक श्रीधरस्वामी पंचगव्हाणकर यांनी आईसाहेब या लेखातून मुक्ताई रूपाचे वर्णन केले आहे. डॉ. आशिष लोहे यांनी सालबर्डीच्या महायोगिनी या लेखातून आपल्या मुक्ताबाईंच्या आधी महानुभाव संप्रदायाशी जोडलेल्या आणखी एक मुक्ताईंचा शोध घेतला आहे. संजय सोनवणी यांनी दोघी या लेखातून नाथपंथी मुक्ताईंची ओळख करून दिली आहे. गिरीश अवघडे यांनी तमाशा पंढरीची ग्रामदेवता या लेखातून नारायणगाव येथील ग्रामदेवता मुक्ताईंच्या यात्रेचे वर्णन केले आहे. राहुल बोरसे यांनी शेळगावच्या मुक्ताई या लेखातून इंदापूर तालुक्यातील शेळगावात असणाऱ्या संत मुक्ताई यांच्या समाधी मंदिराच्या भेटीचे वर्णन केले आहे. चन्नवीर भद्रेश्वरमठ यांनी मुक्तायक्का लेखात लिंगायत धर्मात होऊन गेलेल्या मुक्ताई म्हणजेच शरणी आणि वचनकार मुक्तायक्का यांचे वर्णन केले आहे. डॉ. राहुल हांडे यांनी सख्या मुक्ताईच्या या लेखात मुक्ताईसारख्याच स्त्रीसंतांच्या मांदियाळीचे वर्णन केले आहे. सुहास नाईक यांनी मुक्ता ते मुक्ता या लेखात सत्यशोधक मुक्त साळवे यांच्या नामाचा इतिहास व चरित्राचा मागोवा घेतला आहे. विशाखा शिर्के यांनी कलेतल्या मुक्तखुणा या लेखात मुक्ताईंवरील गाणे, नृत्य, नाटक, सिनेमा, सिरीयल यासंदर्भात माहिती दिली आहे. तसेच पडद्यावरचे मुक्ताई दर्शन यात मुक्ताईंवर आलेल्या विविध चित्रपटांची माहिती देखील आहे. डॉ. राजेंद्र थोरात यांनी कादंबरीमय मुक्ताई या लेखात संत मुक्ताई यांच्यावर आधारित विविध कादंबऱ्यांची नोंद घेतलेली आहे. गणेश आढाव यांनी चालवलेले माझी माऊली यूट्यूब चैनल, विशाल खोले यांचे अभंग गायन, मुक्ताईंच्या विविध फेसबुक पेजची माहिती रिंगणमध्ये आहे. अमृता देसर्डा यांनी वीज म्हणाली कोथळीच या लेखात भूगोल, विज्ञान व रसायनशास्त्राचे अभ्यासक डॉ. रघुनाथ शुक्ल यांच्या कोथळी येथे वीज पडल्याच्या संशोधनाचा उल्लेख केला आहे. मोतीराम पौळ यांनी संशोधनात या लेखात संत मुक्ताई यांच्यावर पीएचडी संशोधन करणाऱ्या संशोधकांचा नामोल्लेख केला आहे. डॉ. जगदीश पाटील यांनी समर्पित या लेखात संत मुक्ताईंची आरती रचनाकार ॲड. गोपाल दशरथ चौधरी यांचे चरित्र वर्णन केले आहे. ॲड. गोपाल चौधरी हे दोन्ही डोळ्यांनी अंध असूनही पत्नी सुलोचना चौधरी यांना तोंडी सांगावे आणि त्यांनी लिहून घ्यावे अशा पद्धतीने अनेक ग्रंथांचे लेखन केले आहे. संत मुक्ताई गाथा व असे सोमेश्वर पुरातन या ग्रंथांचे लेखन ॲड. गोपाल चौधरी यांनी केले असून त्यांचे प्रकाशन महाराज ह.भ.प लक्ष्मण महाराज चिखलीकर यांनी केले आहे. संत मुक्ताईंवर विविध ग्रंथांचे लेखन करणाऱ्या ॲड. गोपाल चौधरी यांचे संपूर्ण आयुष्य हे संत मुक्ताई यांच्यासाठी समर्पित असल्याचेही नमूद करण्यात आले आहे.

रिंगण वार्षिकात विविध लेखकांनी लिहिलेल्या लेखांसाठी वापरलेल्या संदर्भग्रंथांची यादी किंवा माहिती असलेल्या संत मुक्ताई संबंधित ग्रंथांची यादीही संदर्भखुणा म्हणून सर्वात शेवटी देण्यात आलेल्या आहेत. त्यामुळे रिंगण अधिक मजबूत बनले आहे. संत मुक्ताईंचा खऱ्या अर्थाने सर्वार्थाने मागोवा घेण्याचे महत्त्वपूर्ण ऐतिहासिक कार्य रिंगणने केले असून संतपरंपरेचा सामाजिक सांस्कृतिक मागोवा घेण्याचे आपले ब्रीदवाक्य त्यांनी सिद्ध करून दाखवले आहे. त्यामुळे संतपरंपरेची आवड असणाऱ्या तसेच अभ्यासकांनी आपल्या संग्रही ठेवून याचा लाभ घ्यावा, असे हे रिंगण वार्षिक मौल्यवान ठेवा तयार झाले आहे. भास्कर हांडे यांनी रेखाटलेले उत्तम मुखपृष्ठ, वार्षिकाची बांधणी, सर्वोत्तम कागद, उत्कृष्ट छपाई, हवे तेथे रंगीत आणि इतर ठिकाणी ब्लॅक अँड व्हाईट फोटो, रिंगणला वाचकांपर्यंत पोहोचवण्यासाठी हातभार लावणाऱ्या अभंगदूतांची नावे अशी एक ना अनेक वैशिष्ट्यपूर्ण अलंकारांनी सजलेले यंदाचे रिंगण आहे.

# अखेर शिक्षक डी.एस.वाघमारेचा तो बोगस वेतन उचललेला अध्यादेश सापडला.....!

आधुनिक केसरी न्यूज

**सुनिल सिरसाट**

**अंबाजोगाई :** सीईओ साहेब शिक्षण विभाग तथा जि.प. बीडची दिशाभूल आणि फसवणूक करत शाळेवर रुजू न होता वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या आदेशाला केराची टोपली दाखवत मुजोरपणाचे उघडपणे प्रदर्शन करणाऱ्या ज्ञानदेव संतराम वाघमारे या शिक्षकाने रेग्युलर मध्ये चिचखंडी येथील शाळेवर रुजू झाल्यानंतर पूर्वी दिलेल्या दिंद्रुड येथे रुजू न झालेल्या कालावधीचाही चक्क बोगस पगार-वेतन चिचखंडी येथील रेग्युलर वेतना सोबत काढण्याचे आदेश अखेर जि.प. शिक्षण विभागाकडून गटशिक्षणाधिकारी कार्यालय आंबेजोगाई यांच्यासाठी काढून त्या कालावधीतील अनाधिकृत वेतन उचललेच.....!




सीईओ साहेब वाघमारेचे वेतन काढण्यास पुर्णतः जबाबदार गटशिक्षणाधिकारी कार्यालय आंबेजोगाई आहे. तेंव्हा मग तत्कालीन बीईओ रंगनाथ राऊत, ओ.एस.शिवाजी रोडे व ईतर संबंधित कर्मचाऱ्यांवरती कारवाई कधी होणार.....?

सीईओ अजित पवार साहेब हे वेतन अनधिकृत तथा बोगस असल्याने ते काढायला कोणीच तयार नव्हते. परंतु असे कामे करण्यात पटाईत असणारे अंबाजोगाईचे तत्कालीन गटशिक्षणाधिकारी (बीईओ) रंगनाथ राऊत आणि अशा कामात सातत्याने सराईत असणारे राऊतांचे पट्टशिष्य, कार्यालय अधीक्षक (ओ.एस.) शिवाजी रोडे यांनी व त्यांच्या काही महिला सहकारी कर्मचाऱ्यांनी संगनमताने मोठी देवाणघेवाण करत हा वाघमारे नामक शिक्षकाचा महाघोटाळा-महाप्रताप केला असल्याचे त्याच कार्यालयातील आणि कार्यालयाशी संबंधित सुत्रांनी नाव न छापण्याच्या अटीवर आमच्या प्रतिनिधीला माहिती सांगितली आहे.

**शिवाजी रोडे चा या बोगस वेतन प्रक्रियेमधे सिंहांचा वाटा असल्याचा दावा**

डी.एस. वाघमारे सह ईतर काही शिक्षिकांचे वेतन अशाच पद्धतीने काढण्यामागे जि.प. शिक्षण विभागातील काही वरिष्ठ अधिकाऱ्यांना तर गटशिक्षणाधिकारी कार्यालयातील तत्कालीन गटशिक्षणाधिकारी रंगनाथ राऊत यांना हे बिल काढण्यासाठी सर्वकाही पटवून सांगण्यामध्ये गटशिक्षणाधिकारी कार्यालय अंबाजोगाई येथील ओ.एस. शिवाजी रोडे यांचाच सिंहाचा वाटा असल्याचा नव्हे तर मुख्य सूत्रधारच रोडे असल्याचाच दावा आता अनेकजण गुप्तता बाळगण्याच्या नावाखाली करताहेत. तेंव्हा सीईओ साहेब आता चौकशी समिती नेमून अगोदर सखोल चौकशी होणे गरजेचे आहे. मगच कळेल काय खरं काय खोटं.....!

**शिवाजी रोडे हे कागदी घोडे नाचवण्यात मर्यादेपेक्षा पुढे असल्याने हे कोडे आता चौकशीचे घोडे लागल्याशिवाय सुटणार नाही**

सीईओ साहेब आणि शिक्षणाधिकारी साहेब अंबाजोगाई गटशिक्षणाधिकारी कार्यालयातील कार्यालयीन अधीक्षक तथा ओ.एस. शिवाजी रोडे हे कागदी घोडे नाचवण्यात अगदी पुढे असल्याने आता जर का हे कोडे सोडवायचेच असेल तर चौकशीचे घोडे मागे लागल्याशिवाय या प्रकरणात हात काळे असलेल्यांची पाळेमुळे सापडणार नाहीत आणि पळापळी होणार नाही. तेंव्हा एकदा चौकशीचा ससेमेरा पाठीमागे लावलात की मग सारचित्र लक्षात येईल आणि मग बोगस वेतन काढून आजही मोकाटपणे नौकरी करत असलेल्या डी.एस. वाघमारे आणि त्यास मदत करणारे सर्व कर्मचारी-अधिकारी यांच्यावरती बेधडकपणे कठोरात कठोर कारवाई करण्यात आपण पण मोकळे असे चित्र निर्माण होईल आणि मग गेल्या २-३ वर्षांचे हे भिजत घोंगडे , शाश्वत सत्य ऐकदा सर्वांसमोर येईल. होणारांवरती कारवाई होईल आणि नव्याने असे करणा-यांना धाक बसेल हे निश्चित......!

तेंव्हा साहेब आपण आता किती तातडीने या प्रकरणाची चौकशी लावता आणि एकदाचा याचा सोक्षमोक्ष करत छडा लावता याकडे संपूर्ण अंबाजोगाई तालुक्याचे लक्ष लागून आहे..........!!

# अजिंठा लेणीतील सप्तकुंड धबधबा चार वर्षांपासून बंद

## वनविभागाच्या गलथान कारभारामुळे पर्यटकांचा हिरमोड

आधुनिक केसरी न्यूज

**गोकुळसिंग राजपूत**

**सोयगाव :** तालुक्यातील फर्दापूर येथील जगप्रसिद्ध अजिंठा लेणी बघण्यासाठी देश, विदेशातील पर्यटक भारतात येतात. पावसाळ्यामधील निसर्गरम्य वातावरण व हिरवाईने नटलेली जगप्रसिद्ध लेणी व त्यावर निसर्गाने पांघरलेला हिरवा शालू,त्यातच नयनरम्य छोटे-मोठे धबधबे हे बघण्यासाठी हजारोच्या संख्येने पर्यटक हे लेणी बघण्यासाठी पावसाळ्यामध्ये जास्त प्रमाणात आपल्या परिवारासह आनंद घेण्यासाठी येतात. या पर्यटकांना आकर्षण असलेला लेणीजवळील वनविभागाअंतर्गत सप्तकुंड धबधबा हा पाहता येत नाही याचे कारण असे की, वनविभागाच्या बेजबाबदार कर्मचाऱ्याच्या सतत गैरहजेरीमुळे गेल्या चार वर्षापासून तो बंद आहे.



सप्तकुंडमधून तापी खोऱ्याला मिळणाऱ्या वाघुर नदीचा उगम होतो. अशा ह्या उगमस्थान असणाऱ्या सप्तकुंड धबधबा बघण्यासाठी पर्यटकांचा गेल्या चार वर्षापासून हिरमोड होताना दिसत आहे. हा सप्तकुंड का बंद ठेवला तर याचे कारण असे की, चार-पाच वर्षांपूर्वी या ठिकाणी एक छोटी दरड कोसळली होती. त्यावेळेस सप्त कुंडाकडे जाणारा मुख्यरस्ता, गार्डनकडील रस्ता हा बंद करण्यात आला होता. त्या ठिकाणी काटे, कुंपण लावून येणाऱ्या पर्यटकांना सप्तकुंडाकडे जाणाऱ्या रस्त्यापासूनच माघारी फिरावे लागत होते. जी दरड कोसळली होती ती आजपर्यंत त्याच अवस्थेमध्ये आहे ते फक्त आणि फक्त अजिंठा वन विभागातील अधिकारी, व कर्मचारी यांच्या ढिसाळ कारभारामुळेच तशीच पडून आहे.

याबाबत अजिंठा वनविभागाने शासनाकडे आजपर्यंत कोणताही पाठपुरावा केलेला नाही. ही दरड काढण्यासाठी आम्हाला निधी उपलब्ध करावा लागेल, पाठपुरावा करावा लागेल. असे प्रश्न व उत्तरे दरवर्षी आम्हा पत्रकारांना देतात. मात्र यांनी कुठल्याही प्रकारचा पाठवपुरावा हा चार वर्षात केलेला दिसून येत नाही. अजिंठा वनविभागाचा एकही अधिकारी, कर्मचारी याकडे साधे फिरकून सुद्धा बघत नाही कारण अजिंठा लेणीचा जो परिसर आहेत त्या परिसरातून नदी जवळील मुख्य सप्तकुंडाकडे जाणारा रस्ता असून व वनविभागाची जी छत्री आहे ज्या ठिकाणी पर्यटक बसतात व निसर्गरम्य वातावरणामध्ये लेणीचा संपूर्ण परिसर त्या ठिकाणाहून फोटोशुट करतात. त्या छत्रीची जी हद्द आहे ती अजिंठा वनविभागामध्ये येते.सन २०२१ या साली वन वनविभागाच्या हलगर्जीपणामुळेच मुंबई येथील एक तरुण मुलगा जळगाव येथे वैद्यकीय शिक्षण घेत असताना आपल्या मित्रासोबत अजिंठा लेणीची सैर करण्यासाठी आला होता.त्यावेळेस छत्रीपासूनच काही अंतरावर कठडे तुटलेले आहेत ते ओलांडून त्या ठिकाणी सप्तकुंड धबधबाचे फोटो काढत असताना त्याचा तोल गेला होता आणि तो कुंडामध्ये पडला होता सुदैवाने तो वाचला मात्र आज रोजी त्या ठिकाणी तुटलेले लोखंडी पाईप, संरक्षण कठडे हे तुटलेल्या अवस्थेत आज रोजी जैसे थे वैसे तसेच पडून आहेत. कोणत्याही प्रकारची सुधारणा आज पर्यंत अजिंठा वनविभागाच्या बेजबाबदार अधिकारी व काम चुकार कर्मचाऱ्यांकडून झालेली नाही. तसेच त्या ठिकाणी वनविभागाचा एकही अधिकारी किंवा कर्मचारी सहा सहा महिने फिरकून सुद्धा बघत नाही किंवा एक ही कर्मचारी त्या हद्दीत तैनात सुद्धा दिसत नाही. आज रोजी पर्यटकांना त्या ठिकाणी बसण्यासाठी साधी व्यवस्था सुद्धा नाही. छत्रीची अशी अवस्था झालेली आहे की, त्या छत्रीवरील संपूर्ण पत्रे उडालेले आहेत. छत्रीपासून काही अंतरावर खाली उतरण्यासाठी पायऱ्या आहेत. त्या ठिकाणीसुद्धा कोणत्याही प्रकारची संरक्षण भिंत, लोखंडी पाईप कठडे म्हणून बांधलेले नाही. पर्यटकांना जीव मुठीत घेऊन तिथून उतरावे लागते. दरवर्षी वनविभागाला लाखो रुपयाचा निधी मिळतो. मात्र तो निधी अजिंठा वनविभागाने अजिंठा लेणी वनपरिसरात आज रोजी कुठेही खर्च केलेला दिसून येत नाही. येणाऱ्या पर्यटकांना साधी बसण्यासाठी व्यवस्था नाही. अधिकारी व कर्मचारी मात्र घरी बसूनच राज्य शासनाचा फुकटचा पगार घेत आहेत. सप्तकुंडकडे जाणारा मुख्य रस्त्यावर पडलेली दरड हटवून रस्ता मोकळा करण्यात यावा. वरील छत्रीजवळील तुटलेले संरक्षण कठडे बांधण्यात यावे. याकडे वनविभागाने लवकरात लवकर लक्ष देऊन येणाऱ्या पर्यटकांना सप्तकुंड धबधबा बघता येईल अशा मागण्या पर्यटक करत आहेत. तसेच या वनविभागाच्या समस्याच्या बाबतीत तक्रारी आलेल्या हजारो पर्यटकांनी तीव्र नाराजी व्यक्त केली.

## दिलगिरी

**दि. 26/07/2022 रोजीच्या अंकात पान क्र. 3 वरील**

**"1072 प्राथमिक पदवीधरांची वेतनश्रेणी रद्द करण्याचा निर्णय म्हणजे "चोर सोडून संन्याशाला फाशी.....!" असल्याचा शिक्षकांचा दावा"**

**या बातमीमध्ये नजरचुकीने इतर व्यक्तींचे छायाचित्र छापून आले असून त्याबद्दल आधुनिक केसरी दिलगिरी व्यक्त करीत आहे.**


1072 प्राथमिक पदवीधरांची वेतनश्रेणी रद्द करण्याचा निर्णय म्हणजे "चोर सोडून संन्याशाला फाशी.....!" असल्याचा शिक्षकांचा दावा

शासन मान्यता प्राप्त लिलाव भिशी U65929MH2017PTC296394
दिंडोरी चिट फंड प्रा.लि.
आपले जीवन आनंदमय जगा....
तुमच्या बचतीवर योग्य गुंतवणूक हप्त्याने भरा आणि एक रक्कम पैसे मिळवा.
कमीत कमी व्याज दर योग्य मोबदला एक रक्कमी पैसे मिळवा आणि हप्त्याने परतफेड करा.
• सेंट्रल ॲक्ट १९८२ नुसार मान्यता प्राप्त
• पासबुक व पावतीची सोय
• लिलाव भिशी बोलीची मर्यादा ५% ते ४०% पर्यंत
• सर्व व्यवहार धनादेशाद्वारे
संपर्क: श्री.सतीष देशपांडे मो. 9730527669, 9623556611, 0240-2481122

आरोग्याकडे दुर्लक्ष करु नका
आरोग्यम् धनसंपदा



शहरातील एक विश्वसनीय सुपर मार्केट
महावीर
घर संसार




• घाऊक आणि किरकोळ
• किराणा, सुका मेवा, मसाले
• क्रॉकरी, घरगुती उपकरणे
• घर साफ करणारे साहित्य, स्टील आणि ॲल्युमिनियम
• प्लास्टिकच्या वस्तू आणि बरेच काही

सुमित 7620111118 राजेश जैन
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअप ऑर्डर आणि कोणतीही ऑर्डर 9850017181
वितरण स्थिती 9021395308 9657398232
घाऊक चौकशी 7620111118 9527111185

www.mahavirbestprice.com sumitparakh73@gmail.com
S.p. रोड, चेलीपुरा, शहागंज, औरंगाबाद
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर MIDC चिकलठाणा, औरंगाबाद

# विश्वास देशपांडे यांचे साहित्य कल्याणवादी : भारत सासणे

आधुनिक केसरी न्यूज

**चाळीसगाव :** विश्वास देशपांडे यांच्या अष्टदीप, रंगसोहळा, आनंदाच्या गावा जावे या तीन पुस्तकांचे प्रकाशन काल ९५ व्या अखिल भारतीय साहित्य संमेलनाचे अध्यक्ष भारत सासणे यांच्या हस्ते झाले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाराष्ट्र साहित्य परिषद पुणेचे कार्याध्यक्ष प्रा मिलिंद जोशी होते. व्यासपीठावर विश्वकर्मा प्रकाशनाचे सीईओ विशाल सोनी, संपादक मनोहर सोनवणे, संदीप तापकीर तसेच महाराष्ट्र साहित्य परिषद कार्यकारिणी सदस्य प्राचार्य तानसेन जगताप हे उपस्थित होते. आपल्या भाषणात विश्वास देशपांडे यांच्या साहित्याचा गौरव करताना भारत सासणे म्हणाले की त्यांच्या लेखनाला आनांदावादी, प्रेरणावादी म्हणता येईल तसेच माझ्या मते ते कल्याणवादी आहे. महाराष्ट्रात लघुनिबंध या प्रकारात ना सी फडके, वि स खांडेकर आदींनी लघुनिबंध ज्या पद्धतीने लिहिलेत,त्याच पद्धतीचे लघुनिबंध आणि ललित लेखन विश्वास देशपांडे यांनी केले आहे. या लघुनिबंधातून विविध उदाहरणाद्वारे देशपांडे यांनी सकारातमक आणि आनंददायक पद्धतीने कसे जगता येईल याचे सूत्र आपल्यासमोर ठेवले आहे. ' आनंदाची पेरणी केली तर आनंद उगवून येईल ' यासारखी सूत्रे, विचार ते सहज सांगून जातात. स्त्रियांना ते देवघर उजळणाऱ्या निरंजनाची उपमा देतात. विश्वास देशपांडे यांचे अष्टदीप हे पुस्तक प्रत्येक विद्यार्थ्याकडे एक संदर्भग्रंथ म्हणून असावे इतके ते महत्वाचे आहे असे ते बोलताना म्हणाले.



कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रा मिलिंद जोशी यांनी विश्वास देशपांडे यांच्या तीनही पुस्तकांचा आपल्या भाषणात सखोल आढावा घेतला. ते म्हणाले, ' आज आपण आपल्यासमोर आदर्श राहिले नाहीत अशी तक्रार करतो पण खरे म्हणजे लोकांपुढे चांगल्या पद्धतीने आदर्श ठेवणाऱ्यांची, सांगणाऱ्यांची वानवा आहे. विश्वास देशपांडे यांची तीनही पुस्तके ही उणीव भरून काढताना आपल्याला दिसतात. साहित्य निर्मितीचा केंद्रबिंदू आता केवळ मुंबई, पुणे यासारख्या शहरांपुरता मर्यादित राहिला नसून तो ग्रामीण भागाकडे सरकतो आहे याचं उदाहरण म्हणजे विश्वास देशपांडे यांचं लेखन आहे. त्यांचं लिखाण हे चिंतनशील, उपक्रमशील आणि समाजाला उपकारक अशा पद्धतीचं आहे. उत्तम चरित्रलेखन कसं करावं याचा आदर्श म्हणजे त्यांचं अष्टदीप हे पुस्तक. उत्तम ललित लेखन कसं करावं त्याचा आदर्श म्हणजे देशपांडे सरांचं आनंदाच्या गावा जावे हे पुस्तक आणि उत्तम चिंतनशील लेखन कसं करावं याचा आदर्श म्हणजे विश्वास देशपांडे यांचं रंगसोहळा हे पुस्तक आहे. त्यांच्या अष्टदीप या पुस्तकातून हिरो आणि आयडॉल्स यातील फरक आपल्या लक्षात येतो. हिमालयासारख्या उत्तुंग व्यक्तिमत्वाची चरित्रे ते अष्टदीप या पुस्तकातून आपल्यासमोर उभी करतात. तर आनंदाच्या गावा जावे या पुस्तकातून सकारात्मक विचारांची आरास मांडतात.

या कार्यक्रमात विश्वकर्मा प्रकाशनाचे प्रमुख विशाल सोनी, संपादक मनोहर तापकीर, महाराष्ट्र साहित्य परिषदेचे कार्यकारिणी सदस्य प्राचार्य तानसेन जगताप यांनी आपले विचार व्यक्त केले. कार्यक्रमाला पुण्यातील प्रतिष्ठित नागरिक, कवी, लेखक यांची बहुसंख्येने उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मनीष गोखले यांनी केले तर सारिका देशपांडे-दिंडोकार यांनी उपस्थितांचे आभार मानले.

# जनतेच्या कामासाठी सदैव तत्पर राहील : मनोज पवार

आधुनिक केसरी न्यूज

**कन्नड :** पावसाळा सुरू झाला की कन्नड बसस्थानकात पाणी साचते व प्रवाशांची चांगलीच फजिती होते. गावी जाणारे प्रवाशी घरून निट-नेटके येतात पण, बसस्टॉपमध्ये आले की गढुळ पाणी व चिखलातून जाऊन बस पकडावी लागते. लहान मुले व वयोवृध्दांचे तर अक्षरक्ष अंगावर खराब व गढुळ पाणी पडून कपडे चिखलाने माखले जातात, पण दरवर्षी आगारप्रमुख सदरील कामासाठी प्रस्ताव पाठविला आहे. मंजुरी मिळाल्यास लगेच कामाला सुरुवात केल्या जाईल, असे सांगून वाटाण्याच्या अक्षता हातावर देतात. मात्र घाणेरडे साचलेले तळे, घाणीचे साम्राज्य यासंदर्भात शहरातील युवा उद्योजक मनोज पवार यांच्या कानावर ही समस्या पडताच त्यांनी याची दखल घेत स्वखर्चातून ते खड्डे बुजविले. यामुळे प्रवाशांनी समाधान व्यक्त केले आहे. कन्नड बसस्थानक दुरुस्ती व बस स्थानकातील खुल्या जागेवरील पावसाळ्यापूर्वीची कामे आगाराने आधीच करायला हवी होती.



**प्रवाशांना होणारा त्रास पाहून युवा उद्योजक मनोज पवार यांनी स्वखर्चाने बस स्थानकावरील खड्डे बुजवल्याने प्रवाश्यांतून त्यांचे कौतुक होत आहे.**

मात्र गेल्या कित्येक दिवसांपासून या आगारात मोठमोठे खड्डे पडले आहेत. या खड्ड्यांमध्ये आता पावसाचे पाणी साचत आहे. या ठिकाणी येणाऱ्या प्रवाशांना हा त्रास सहन करावा लागणार ही बाब युवा उद्योजक मनोज पवार यांच्या लक्षात येताच आपणही समाजाचे काही देणे लागतो या भावनेतून तत्काळ स्वखर्चातून तात्पुरत्या स्वरूपात खडी व मुरूम आणून कन्नड बस स्थानकातील पाणी साचलेले खड्डे बुजविण्याचे काम हाती घेऊन ते पूर्णही केले. यामुळे प्रवाशांकडून त्यांचे कौतुक केले जात आहे.

# शिवराईच्या शेतकऱ्यांना न्याय द्या अन्यथा रस्त्यावर उतरू : उदय गवळी



आधुनिक केसरी न्यूज

**कन्नड :** शिवराई येथे गट 49 चे मालक रामभाऊ अंबादास नांगरे यांच्या शेतात कपाशीवर बोगस औषधांची फवारणी केल्यामुळे कपाशी जळून खाक झाली. याबाबतची तक्रार 20 जुलै रोजी जनशक्ती शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष अनिल पाटील शेळके यांच्या आदेशानुसार उपजिल्हाप्रमुख उदय गवळी, उपतालुकाप्रमुख सचिन शेजुवळ, युवा उपतालुकाप्रमुख समाधान आहेर, तालुका कृषीआधिकारी बळराजे मुळीक यांच्या कडे सदरील शेतकऱ्याने केली. कृषिअधिकारी यांनी तक्रारीची दखल घेऊन दिनांक 21 जुलै रोजी दुपारी दोन वाजता स्थळ पंचनामा करून पुढील स्वॅप पावर तणनाशक कंपनी व नवं अंकुर कुषीसेवा केद्र दुकानदार यांच्यावर कार्यवाही करण्यात येईल असे कृषीअधीकारी बळराजे मुळीक यांनी सांगितले होते, मात्र त्यात आतापर्यंत काय झाले कळालेच नाही. त्यामुळे शिवराई येथील शेतकऱ्याला योग्य तो न्याय दयावा अन्यथा रस्त्यावर उतरू असा इशारा गवळी यांनी दिला आहे.

**आम्ही शिवराई येथे शेतकऱ्यांच्या शेतात जाऊन आलो असून सदरील स्थळ पंचनामा करून पुढील स्वॅप पावर तणनाशक कंपनीचे औषधी या तपासनीसाठी पाठवले आहे.त्यात दोषी आढळल्यास कुषीसेवा केद्र व दुकानदार यांच्यावर कार्यवाही करण्यात येईल.**
**-बाळराजे मुळीक, कृषी अधिकारी**

# सोयगाव तालुक्यात आता दहा रुपयांची नाणी स्वीकारणे बंधनकारक

आधुनिक केसरी न्यूज

**गोकुळसिंग राजपूत**

**सावदबारा :** सोयगांव सह तालुक्यात व सावळदबारा परिसरात भारतीय चलनात भारतीय रिझर्व्ह बँकेने जारी केलेले दहा रुपयांचे (१० रुपये ) नाणे काही ठिकाणी स्विकारण्यास नकार दिला जात आहे, अशा तक्रारी जिल्हा प्रशासनाकडे प्राप्त झाल्या आहेत. तथापी, अशा प्रकारे हे नाणे स्विकारणे बंधनकारक असून, भारतीय रिझर्व्ह बँकेने दिलेल्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार भारतीय चलन स्विकारण्यास नकार देणाऱ्या वेगवेगळ्या व्यवसायिक किंवा दुकानदार विरुद्ध कायदेशीर कारवाई करुन त्याच्या विरुध्द गुन्हा दाखल होऊन तो शिक्षेस पात्र ठरेल. असे जिल्हा प्रशासनाने स्पष्ट केले आहे. भारतीय रिझर्व्ह बँकेने दिलेल्या दिशानिर्देशांनुसार, अशाप्रकारे रिझर्व्ह बँकेने जारी केलेले चलन स्विकारण्यास कुणीही नकार देऊ शकत नाही. अशा प्रकारे बँका अथवा व्यापारी, व्यक्ती कायदेशीर चलन स्विकारण्यास नकार देत असतील तर त्यांच्या विरुद्ध कायदेशीर कारवाई होऊ शकते. दहा रुपयांचे नाणे हे राष्ट्रीय चलन आहे. भारत सरकारने वाहकाला चलनाचे मूल्य देण्याचे वचन दिल्याने ते नाकारण्याचा अधिकार कोणालाही नाही. भारतीय चलन स्विकारण्यास नकार देणाऱ्या व्यक्ती विरुद्ध कलम १२४ अंतर्गत गुन्हा दाखल केला जाऊ शकतो.

गुन्हा दाखल करण्यासाठी नाणे नाकारणाऱ्या व्यक्तीकडून लेखी स्वरुपात नाणे नाकारण्याचे कारण घ्यावे. त्याचा तपशील



स्थानिक पोलिसांना दिल्यानंतर पोलिस संबंधितांविरुद्ध गुन्हा दाखल करतील. या गुन्ह्यात दंडासह तीन वर्षांचा तुरुंगवास अशी शिक्षेची तरतूद आहे, असे रिझर्व्ह बँकेच्या निर्देशांत म्हटले आहे.

## फर्दापूर पोलीस यंत्रणेचे निर्देश

**यासंदर्भात औरंगाबाद जिल्हा प्रशासनाकडे प्राप्त तक्रारींची गंभीर दखल घेण्यात आली असून, अशा प्रकारे चलनातील नाणी स्विकारण्यास नकार देणाऱ्या व्यक्तींविरुद्ध भादंवि कलम १२४ नुसार गुन्हा दाखल करून कारवाई करावी,असे निर्देश फर्दापुर पोलीस स्टेशनचे कर्तव्यदक्ष दबंग सहाय्यक पोलीस निरीक्षक देवीदास वाघमोडे यांनी दिली आहे.**

होल्डिंग हॅन्ड्स
बहुउद्देशिय संस्था, औरंगाबाद
समाजाच्या हितासाठी एकमेकांचा हात धरून मानवी साखळी बनवूया.
संस्थेचे उद्देश
माणसे जोडणे । आरोग्य । शिक्षण । पर्यावरण । सांस्कृतिक
महिला लघु उद्योग आणि रोजगार । सामाजिक बांधिलकी असलेले सर्व उपक्रम

सुरेश सिरसीकर
संस्थापक/ अध्यक्ष

रविंद्र बनकर
उपाध्यक्ष

अपर्णा मेहता
सचिव
अधिक माहितीसाठी : 7020577693 । holdinghands092@gmail.com

# डॉ. विलास राजपुत यांच्या बेजबाबदारपणामुळे ग्रामस्थांचे आरोग्य धोक्यात

आधुनिक केसरी न्यूज

**बहादुर चव्हाण**

**देव्हारी :** सोयगाव तालुक्यातील डाभा गाव चे आरोग्य उप केंद्र हे दोन वर्षांपासुन डाक्टरांनी कुलुप ठोकुन केले बंद त्यामुळे डाभा येथील ग्रामस्थांचे होत आहे मोठे हाल डाभा येथील गावकऱ्यांना सात ते आठ कीलोमीटर जळगाव जिल्ह्यातील देऊळगाव गुजरी येथे खाजगी रुग्नालयात जाव लागत आहे उपचारासाठी मात्र... डॉ. विलास राजपुत यांचा प्राथमीक आरोग्य केंद्राकडे दुर्लक्ष डॉ. विलास राजपुत यांचा पुन्हा बेजबाबदार पणा आला समोर वरिष्ठ अधिकाऱ्यांचे सतत दुर्लक्ष असल्यामुळे हा मनमाणी कारभार लगातार आहे.

सोयगाव तालुक्यातील सावळदबारा आरोग्य केंद्राअंतर्गत डाभा उप आरोग्य केंद्र दोन वर्षांपासुन कुलुप ठोकुन बंद असुन डॉ. विलास राजपुत यांच मात्र दुर्लक्ष डाभा गावच्या ग्रामस्थांचे आरोग्य धोक्यात अनेक ग्रामस्थांना गसट्रो ची लागन झाल्याचे डाभा येथील ग्रामपंचायत सदस्य आणि गावकऱ्यांनी सांगितले सावळदबारा प्राथमिक आरोग्य केंद्र हे 18 गावांचे केंद्र असुन या 18 गावांचे सध्या हालच हाल दिसुन येत आहे. वेळेवरती रुग्नांचा उपचार केला जात नाही सध्या पावसाळा सुरु असुन पीन्याच्या पाण्याची कोनतीही तपासणी डाक्टरांकडुन होत नाही. गावक-यांच्या आरोग्याशी सध्या खेळले जात आहे. डाक्टर राजपुत हे उप केंद्रांना भेट देत नसल्यामुळे डाभा गावचे ग्रामस्थ ना ईलाजाने बाहेर गावी खाजगी रुग्नालयात उपचारा साठी जात आहे.

शासनाने लाखो रुपये खर्च करुन डाभा गाव येथे आरोग्य उप केंद्र बांधलेले असुन त्या ठीकाणी एक ही कर्मचारी थांबत नाही. त्यामुळे उप केंद्राचा कोनताही फायदा या गावक-यांना होत नाही या उप केंद्रा समोर पुर्ण घानीचे साम्राज्य पसरलेले आहे. डाक्टर विलास राजपुत हे मुख्यालयास वास्तव्य करुन राहत नसुन जळगाव जिल्ह्यातील जामनेर तालुक्यामधे राहतात. त्यामुळे त्यांच सावळदबारा आरोग्य केंद्राकडे नेहमी दुर्लक्ष असत या अगोदर त्यांच्या अनेक वेळेस वरिष्ठ अधीका-यांकडे तक्रारी केल्या आहे. डाक्टर राजपुत सतत गैरहजर आणि बाहेर गावी वास्तव्य करुन राहतात. डॉ. राजपुत यांच्यावराती कोनतीही कारवाई झालेली नाही या अगोदर अनेक वेळेस पेपर आणि चैनल ला या डाक्टर विरोधामधे बातम्या प्रसारीत झालेल्या आहे मात्र वरिष्ठ अधीकारी यांचा डाक्टरच्या डोक्यावराती हाथ आणि आशिर्वाद असल्यामुळे कोनतीही कारवाई होत नाही सावळदबारा प्राथमिक आरोग्य केंद्राचे बेजबाबदार डाक्टर राजपुत यांच्यावरती कधी कारवाई होनार या परीसरातील नागरीकांना वेळेवरती कधी उपचार मिळनार असे अनेक प्रश्न सावळदबारा प्राथमीक आरोग्य केंद्र, डाभा आणि 18 गावांच्या परिसरामधे नागरिकांना पडलेले आहे. शासन प्रशासन वरिष्ठ अधीकारी या बेजबाबदार डाक्टर वरती कधी कारवाई करनार याकडे सर्वांचे लक्ष लागलेले आहे.

# अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त मोफत नेत्र तपासणी शिबीराचे आयोजन

आधुनिक केसरी न्यूज

**सांगली :** बागणी ता. वाळवा येथे महाराष्ट्रातील सर्वात मोठे डोळ्यांचे हॉस्पिटल नेटवर्क असणाऱ्या डॉ. ठाकूर यांचे इन्फिगो आय केअर हॉस्पिटल सांगली यांच्या वतीने साहित्यसम्राट लोकशाहीर अण्णा भाऊ साठे जयंती उत्सव समिती आणि सत्यशोधक विचारमंच, बागणी यांचे सहकार्याने, दिपगंगा भागीरथी बहुउद्देशीय सेवाभावी संस्था, सांगली. महाराष्ट्र राज्य यांचे संयुक्त विद्यमाने बागणी व बागणी पंचक्रोशीतील चौदा गांवे आणि वाड्या-वस्त्यावरील सर्व नागरिकांच्यासाठी मोफत नेत्र तपासणी शिबिराचे आयोजन केले होते.

बागणी ग्रामपंचायत जवळील मारुती मंदिर मध्ये आयोजित केलेल्या या मोफत नेत्र तपासणी शिबिर मध्ये पुरुष व महिला वर्गातील तरुण, ज्येष्ठ नागरिकांचा उत्स्फूर्तपणे प्रतिसाद मिळाला. आर्थिकदृष्ट्या दुर्बल, निराधार लोकांना पन्नास टक्के सवलतीत चष्मे वाटप केले. मोतिबिंदू व काचबिंदू परीक्षण, तिरळेपणा आणि डोळ्यांच्या पडद्याची तपासणी अश्या सर्वंकष मोफत तपासण्या केल्या.

नेत्र शिबिराचे उदघाटन बागणी गावचे विद्यमान सरपंच श्री. संतोष घनवट यांचे शुभ हस्ते झाले. सदर नेत्र शिबिरास बागणी गावचे उपसरपंच श्री. विष्णू किरतसिंग आणि सदस्य श्री. सतीश थोरात तसेच हॉस्पिटलचे श्री. धनंजय पराडकर, मॅनेजमेंट विभागाचे शरद भद्रे, मेरी खानविलकर आणि स्टाफ, दिपगंगा भागीरथी बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेचे संस्थापक, अध्यक्ष तथा शिबिराचे आयोजक साहित्यिक, समाजसेवक हिंदरत्न दिपक लोंढे, संस्थेचे खजिनदार श्री. शिवाजी थोरात, सत्यशोधक विचार मंच, साहित्यसम्राट लोकशाहीर अण्णा भाऊ साठे जयंती उत्सव समिती आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर युवा मंच बागणीचे सर्व मान्यवर पदाधिकारी, सदस्य आणि कार्यकर्ते उपस्थित होते. सदर नेत्र शिबिरास सर्वांचेच अनमोल सहकार्य लाभले. आयोजकांनी सर्वांचे आभार मानले.

# राস্त भाव दुकानदारांना आय एस ओ सक्ती कशासाठी ?

## नाशिक जिल्हा रास्त भाव दुकानदार संघटनेचे प्रधान सचिवांना निवेदन

आधुनिक केसरी न्यूज



**निफाड :** गोरगरीब व सामान्यांच्या मूलभूत गरजांची पूर्तता व्हावी या दृष्टिकोनातून शासनाने रास्त भाव दुकाने सुरू केली असून अतिशय चांगल्या पद्धतीने सुरू असलेल्या रास्त भाव दुकानदारांना सद्यस्थितीत आय एस ओ सक्ती केल्याने रास्त भाव दुकानदार अडचणीत सापडले असून नाशिक जिल्हा रास्त भाव दुकानदार संघटनेने प्रधान सचिव, अन्न नागरी पुरवठा, जिल्हा पुरवठा अधिकारी, तहसिलदार यांना निवेदन रास्त भाव दुकानदार यांना निवेदन दिले आहे.

या निवेदनात असे म्हटले आहे की रास्त भाव दुकानदारांना आय.एस.ओ. बाबत सक्ती करु नये. या बाबत पूर्वीच ऑल महाराष्ट्र फेडरेशन पुणे ( रजि ) यांनी .८ / १ / २२ व १२ / ३ / २२ रोजी निवेदन दिलेले आहे व तसे महाराष्ट्र शासनाचे ८ मार्च व २२ मार्च चे पत्रही आलेले आहे. तरी आपल्या कार्यलय कडून आय.एस.ओ.करीता सक्ती केली जात आहे ते योग्य नाही ' ही बाब खर्चिक आहे. आमच्या परवानाधारकांना अत्यल्प कमीशन असून महागाईच्या काळात त्यामध्ये तो कसेतरी जीवन जगत आहे. त्यामध्ये हा आय एस ओ प्रमाणपत्र मिळविण्यासाठी खर्च करने परवडण्याजोगा नाही. तरी पण आम्ही सहकार्य करीत आहोत. परंतु आपल्या कार्यालयाकडून सक्ती केली जात आहे. यामुळे आमच्या परवानाधारकांचे मानसीक खच्चीकरण होत आहे. त्यामुळे आमचा परवानाधारकांचा टेन्शन येऊन मृत्यु होई शकतो किंवा तो आत्महत्या करू शकतो असे झाल्यास त्याला संपूर्ण जबाबदार पुरवठा शाखा राहील तेंव्हा आपण सौजन्याने घ्यावे. करोना काळात बस बंद, रेल्वे सेवा बंद, मार्केटसेवा बंद, विमान सेवा बंद, सर्वच व्यवहार बंद होते. इतकेच काय मज्जिद, गुरुद्वारा, चर्च, मंदिराचे दरवाजे सुद्धा बंद होते. त्या काळात फक्त आमच्या परवाना धारकाचे दरवाजे उघडे होते. एवे जिवाशी खेळून सहकार्य केले असतांना आपल्याकडून आम्हाला योग्य वागणूक मिळत नसेल तर योग्य नाही. त्या काळात आमचे अनेक परवानाधारक आम्हाला सोडून गेले. त्यांना मदत तर नाहीच शासनाने सहानुभुती सुद्धा दाखवली नाही. तरी आपण या बाबत योग्य निर्णय घेऊन आय.एस.ओ. प्रमानपत्राकरीता सक्ती करू नये या निवेदनावर निवृत्ती महाराज कापसे, मारुती बनसोडे, ढवळू फसाळे, माधव गायधनी, सुवर्णा रायते, दिलीप नवले, विलास पाटील, दिलीप घोटेकर, विलास वलवे, शरद धामणे, पुंसाराम मुळाणे आदींच्या सह्या आहेत.

# २७ व २९ जुलैला जालना जिल्ह्यात ‘उज्ज्वल भारत- उज्ज्वल भविष्य’ महोत्सव

आधुनिक केसरी न्यूज

**जालना :** आजादी का अमृत महोत्सवांतर्गत 'उज्ज्वल भारत-उज्ज्वल भविष्य -पॉवर @२०४७' हा कार्यक्रम भारत सरकारच्या ऊर्जा मंत्रालय आणि नवीन व नवीकरणीय ऊर्जा मंत्रालय तसेच महाराष्ट्रातील महावितरण, महानिर्मिती, महापारेषण आणि इतर भागीदार यांच्या संयुक्त विद्यमाने राज्य शासनाच्या सहकार्याने साजरा करण्यात येणार आहे. जिल्ह्यात दोन ठिकाणी हा कार्यक्रम होणार आहे.

२७ जुलै २०२२ रोजी (बुधवारी) सकाळी ११ वाजता राजुरेश्वर मंदिर सभागृह, राजूर (ता.भोकरदन) तर २९ जुलै २०२२ रोजी (शुक्रवारी) सकाळी ११ वाजता गजानन मंगल कार्यालय, मंठा (ता.मंठा) येथे कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. पारंपरिक व अपारंपरिक ऊर्जा क्षेत्रासह केंद्र व राज्य सरकारच्या ऊर्जा क्षेत्रातील मागील ८ वर्षांतील उत्कृष्ट कामगिरीची माहिती देण्यासाठी तथा विविध योजनांतील लाभार्थ्यांचा सत्कार व त्यांच्याशी संवाद साधण्यासाठी तसेच ऊर्जा क्षेत्रातील आव्हाने व २०४७ पर्यंतचे नियोजन याकरिता या अभियानाचे आयोजन करण्यात आले आहे. लोकप्रतिनिधींच्या उपस्थितीत होणाऱ्या या कार्यक्रमात केंद्र सरकार व राज्य सरकारच्या विविध विद्युत योजनाच्या माध्यमातून गावपाड्यात, शेतात ऊर्जीकरण झालेल्या कामांची माहिती देणारे प्रदर्शन, ध्वनिचित्रफितीचे सादरीकरण, लाभार्थ्यांचे मनोगत, पथनाट्य तथा सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.




# नगरपरिषद प्रशासनाविरोधात "लॉलीपॉप आंदोलन"

आधुनिक केसरी न्यूज

**बीड :** शहरातील शाळेकडे जाणारे बहुतांश रस्ते पावसाळ्यात चिखलमय असल्याने चिखलात पायातील चप्पल, बुट फसत असुन अपघात होऊन जखमी होऊ शकतात, विद्यार्थ्यांना जीवघेणी कसरत करावी लागत आहे. लोकप्रतिनिधींकडून याबाबत दुर्लक्ष व नगरपरिषद प्रशासनातील अधिका-यांच्या ढिसाळ नियोजनाच्या धोरणाच्या निषेधार्थ सामाजिक कार्यकर्ते तथा कार्याध्यक्ष बाल हक्क संरक्षण संघ महाराष्ट्र राज्य डॉ. गणेश ढवळे लिंबागणेशकर यांच्या नेतृत्वाखाली बशीरगंज चौकात बीड नगरपरिषद कार्यालयासमोर रस्ता, वीज, पाणी आदि. मुलभुत सुविधा न देताच केवळ आश्वासने देऊन बीडकरांची दिशाभूल व फसवणूक केल्याच्या निषेधार्थ "लॉलीपॉप आंदोलन" करण्यात येऊन घोषणाबाजी करत बशीरगंज चौक ते मुख्याधिकारी नगरपरिषद बीड कार्यालय रॅली काढण्यात आली.

बीड जिल्हाध्यक्ष बाल हक्क संरक्षण संघ, शेख युनुस च-हाटकर, पाटोदा तालुकाध्यक्ष सतिश गर्जे, पाटोदा तालुका सचिव हमीदखान पठाण, सामाजिक कार्यकर्ते सय्यद आबेद, शेख मुबीन बीडकर,शिक्षण हक्क आधिकार कार्यकर्ते मनोज जाधव आदि सहभागी झाले होते. प्रशासक मुख्याधिकारी नगरपरिषद बीड उमेश ढाकणे यांना निवेदन देण्यात आले.

पुस्तके खरेदीची सुवर्णसंधी
आपल्या पुस्तकाच्या संग्रहात अमुल्य भर घाला

३ पुस्तकांचा संच मिळवा १०००/- रुपयांत
पुस्तकांवर 20% सूट


गणिताच्या मूलभूत संकल्पना
(१ली ते १०वी व सर्व परीक्षांसाठी उपयुक्त)
MRP ₹ 430/- Offer Price ₹ 345/-
पाने ५३४
गणिताच्या मूलभूत संकल्पना प्रश्नसंच
सर्व शालेय विद्यार्थी, शिष्यवृत्ती परिक्षार्थी व सर्व स्पर्धा परीक्षांना उपयुक्त
MRP ₹ 470/- Offer Price ₹ 375/-

पाने ५३४
श्रीमती छायाताई खेडकर
8888780568

उखाण्यातून गणित
मुलभूत संकल्पना व जनरल नॉलेज
MRP ₹ 360/- Offer Price ₹ 280/-
पाने ३६४
श्री. हरिभाऊ गिते सर
9422742712
गणेश बुक स्टॉल,
भगवानबाबा चौक, पाण्याच्या टाकिजवळ, बीड
मो. 8149196415
दत्तराज पार्क,
बायपासरोड, सावतानगर, गेवराई
मो. 8888780568/9422742712
माऊली अपार्टमेंट,
मंगलमुर्ती कॉलनी, रेणू हॉस्पिटल जवळ,
धाडेनगर, बार्शी रोड, बीड मो. 8793150910

# सोयगाव बस आगाराचा पुन्हा भोंगळ कारभार चव्हाट्यावर

आधुनिक केसरी न्यूज

**गोकुळसिंग राजपूत**

**सोयगाव :** जगप्रसिद्ध अजिंठा लेणी मध्ये दि.२४ वार रविवार रोजी निसर्गरम्य वातावरण, वाहणारे धबधबे लेण्या बघण्यासाठी सकाळी ९:०० वाजेपासून येणाऱ्या पर्यटकांनामध्ये वाढ होताना दिसून आली. मात्र सोयगाव बस आगारातील फक्त बोटावर मोजण्या इतक्या ६ बसेस धावताना दिसून आल्या. जोरदार पाऊस चालू असताना हजारोंच्या संख्येने पर्यटकांना अपूर्ण बस सेवा असल्याने अजिंठा लेणी टी. पॉईंट येथील बसस्थानकावर भर पावसात आपल्या परिवारास आलेल्या पर्यटकांना तासभर ताटकळत उभे रहावे लागले. कारण बस कमी प्रमाणात होत्या व फेऱ्या पण कमी प्रमाणात होत्या. काही पर्यटकांजवळ छत्री नसल्यामुळे आपल्या चिमुकल्या लहान मुलांना भिजत असतांना हे बघून काही पालकांनी चालक, वाहक यांना जाब विचारला की, आम्ही १ तासापासून लाईनमध्ये उभे आहोत गर्दी भरपूर वाढत आहे.

जोरदार पाऊस पडत आहे.आमच्याकडे छत्री पण नाही बस कमी असल्यामुळे आम्ही अजून किती वेळ भर पावसात उभे राहणार?. तेव्हा चालक म्हणाले की, साहेब आमच्या आगार प्रमुख यांनी फक्त ६ बस चालवायला दिल्या आहेत आम्ही काय करणार! अशी माहिती चालक यांनी पर्यटकाला दिली. फर्दापुर येथील एका पत्रकारांनी ग्राऊंड रिपोर्ट घेऊन जिल्हा वाहतूक नियंत्रण अधिकारी अरुण सिया यांना फोन करून सांगितले की, दोन दिवसापूर्वी सुद्धा बंगळरू येथील एका ग्रुपला बस उशिरा आली होती 1 तास ताटकळत उभे राहावे लागले होते. मनस्ताप सहन करावा लागला होता. त्याची वृत्तपत्रा मध्ये बातमी पण प्रसारित झाली होती. सविस्तरपणे माहिती दिली. तेव्हा सोयगांव आगार प्रमुख हिरालाल ठाकरे यांनी दुपारी १:०० वाजता ४ बस पाठवण्यात आल्या. व फेऱ्या पण जास्त प्रमाणात वाढवण्यात आल्या. रिमझिम पाऊस चालू असल्याने संध्याकाळ पर्यन्त ३९०० पर्यटकांनी भेट दिली. आलेल्या हजारो पर्यटकांना निसर्गरम्य वातावरणात व भरपावसात फोटो टिपण्याचा आनंद घेता आला. फर्दापुर पोलीस स्टेशनचे दबंग सहाय्यक पोलीस निरीक्षक डी बी. वाघमोडे, कोळी, पोलिस कर्मचारी तैनात होते.



# मेघ मल्हार व्याख्यानमालेत डॉ. मंगला वैष्णव यांचे व्याख्यान

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** प्रगतीशील ज्येष्ठ नागरिक सेवाभावी संस्था, स्फूर्ती महिला मंडळ, आणि रोटरी क्लब ऑफ औरंगाबाद मिड टाउन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित मेघ मल्हार व्याख्यान मालेचे तिसरे पुष्प गुंफण्यासाठी प्रा. मंगला वैष्णव यांचे "ज्येष्ठांनी मुलांशी कसे वागावे" या विषयावर व्याख्यान आयोजित केले होते. प्रगतीशील ज्येष्ठ नागरिक संस्थेचे अध्यक्ष भरत कुलकर्णी अध्यक्षस्थानी होते. रोटरी क्लब ऑफ औरंगाबाद मिड टाऊन च्या अध्यक्षा रो. दिव्या मराठे, रो. सचिव माधुरी काथार, कोषाध्यक्ष रो. उल्हास मराठे, माजी अध्यक्षा रो.ज्योती काथार, रो. शोभना धारवाडकर, रो. रामेश्वर पवार, रो. विनोद शिनगारे, स्फूर्ती महिला मंडळ च्या अध्यक्षा मंजुषा कोरंगळीकर, प्रगतीशील च्या उपाध्यक्षा विभा श्रीवास्तव आणि सचिव श्रीकांत पत्की यावेळी उपस्थित होते.

प्रार्थना झाल्यावर मान्यवरांच्या हस्ते, प्रतिमा पूजन व दिप प्रज्वलन करण्यात आले. रो. सचिव माधुरी काथार यांनी स्वागत गीत सदर केले व त्यानंतर प्रा. मंगला वैष्णव यांचा सत्कार त्यांनी केला. इतर मान्यवरांचे सत्कार करण्यात आले. रो. मनोज देशमुख यांनी सूत्र संचलन केले. रो. ज्योती काथार यांनी प्रा. मंगला वैष्णव यांचा परिचय करून दिला. रो. शोभना धारवाडकर यांनी आभार प्रदर्शन केले.

व्याख्यानमालेला मेघ मल्हार नाव ज्यांनी दिले त्यांचे प्रा. वैष्णव यांनी कौतुक केले. मेघ मल्हार रागाविषयी त्यांनी माहिती दिली. कालिदासाचे मेघदूत हे काव्य आणि मेघ मल्हार याचा जवळचा संबंध आहे असे त्या म्हणाल्या. पुढे त्यांनी वृद्धत्व आणि ज्येष्ठत्व यातील फरक सांगितला.

वृद्धत्व न मागता येते, ज्येष्ठत्व कमवावे लागते वृद्धत्व परत जात नाही, ज्येष्ठत्व कधीही जाऊ शकते. वृद्धत्व सहज दिसते, ज्येष्ठत्व शोधावे लागते. वृद्धत्व प्रतिकूल परिस्थितीत खचते ज्येष्ठत्व आव्हाने स्वीकारून मिळते. वृद्धत्व दुर्मुखलेले असते, ज्येष्ठत्व प्रसन्न असते. वृद्धत्व इतरांचा आधार शोधते, ज्येष्ठत्व इतरांना आधार देते. वृद्धत्व दुर्लक्षित असते, ज्येष्ठत्व सन्मानित असते. वृद्धत्व लपवावे वाटते, ज्येष्ठत्व दाखवावे वाटते. वृद्धत्व चळते, ज्येष्ठत्व पळते, वळते. वृद्धत्व अहंकारी, हेकेखोर असते, ज्येष्ठत्व नम्र, अनुभव संपन्न असते. वृद्धत्व व्यक्तिमत्व बिघडविते, ज्येष्ठत्व व्यक्तिमत्व घडविते. ज्येष्ठत्व धीरोदात्त असते, संयमी असते, विवेकी असते, अचूक निर्णय क्षमता असते, धृढनिश्चय, मनाची स्थिरता असते, प्रसन्न मनाने जगण्याची कला अंगीकारणे, षड्रीपुवर नियंत्रण, सहनशीलता असते, दुसऱ्यांच्यामतांचा आदर करतात, चुकीची कबुली देण्याचा प्रामाणिकपणा असतो, निराभिमानी, इतरांना आधार देणे अशी लक्षणे असतात. ज्येष्ठांनी आत्मशोध घ्यावा, गरजा मर्यादित ठेवाव्या, अति हव्यास घातक ठरू शकतो, तडजोड करावी, आपल्या काळातील गोष्टी सांगू नयेत, मनाने वानप्रस्थ स्वीकारावा. कमलपत्रवत राहावे, मुला सुनांना त्यांच्या जवाबदाऱ्या कळू द्याव्या, करू द्याव्यात, विचारले तरच सल्ला द्यावा, जशी जमेल तशी समाज सेवा करावी, नकारात्मक दृष्टीकोन ठेवू नये, वयाच्या आड लपू नये, सहानुभूतीची झोळी स्वीकारू नये, ज्येष्ठ वानप्रस्थाश्रमात असतो, उर्वरित आयुष्य समाज सेवेसाठी घालवावे, ज्येष्ठ नागरिक संस्थांनी कसे कार्य करावे याबद्दल त्या म्हणाल्या. एकत्र कुटुंबासारखी संस्था असावी, कृतिशीलता यावर भर द्यावा, सभासदांना संस्था आपली वाटावी, हे संस्थेचं वैशिष्ठ असावे. समाजाविषयी आस्था असावी, सर्वांनी मिळून मतभेदाविना उपक्रम घ्यावेत, आरोग्य विषयक, सामाजिक प्रश्न विषयक चर्चा व कृतिशीलता असावी, प्रत्तेक सभासदाला स्वतः चे म्हणणे सांगण्याची संधी दिली पाहिजे, निरनिराळे सण, उत्सव, जयंत्या, पुण्यतिथ्या, धर्मनिरपेक्षतेने साजरया करावयात, संस्कृती, देशप्रेम, भाषा प्रेम, कुटुंब प्रेम, टिकविण्या साठी कार्य करावे, सुसंवाद, प्रबोधन, जागृती, करमणूक, सभासदांच्या कलागुणांना वाव, सभासदांचा आत्मसम्मान संस्थेने जपावा, प्रत्तेक सभासद आनंदी आणि समाधानी असावा, छोट्या सहली, काढाव्या, एकत्र नाटक, सिनेमे बघावे व संस्था संघटीत करावी. असे शेवटी त्या म्हणाल्या.

## देवेश शैलेश कात्नेश्वरकर याची भारताचा प्रतिनिधी म्हणून निवड

आधुनिक केसरी न्यूज

**वसमत :** येथील सुप्रसिद्ध घराणे म्हणजे कै.विश्वनाथराव कात्नेश्वरकर यांचे घराणे. जून्या काळातील सुप्रसिद्ध वकील, स्वातंत्र्य सेनानी, माजी आमदार विश्वनाथराव कात्नेश्वरकर यांना चार मुले एक मुलगी होती. सर्वात मोठा मुलगा रमाकांत कात्नेश्वरकर, दोन नंबरचा कर्नल सुरेश कात्नेश्वरकर, तीन नंबरचा अंबादास कात्नेश्वरकर आणि धाकटा प्रकाश कात्नेश्वरकर. रमाकांत कात्नेश्वरकर यांना दोन मुले, एक औरंगाबाद येथे एलआयसी मध्ये आहे. दुसरे दिल्ली येथे सर्वोच्च न्यायालयात वकिली करतात. बऱ्याच केसेस मध्ये महाराष्ट्र सरकारचे वकील म्हणून त्यांनी काम पाहिले आहे. कर्नल सुरेश यांना एकच मुलगी आहे. ती विवाहीत असून सुखात आहे.

अंबादास कात्नेश्वरकर यांचे चिरंजीव ॲड सुयश हे ही प्रसिद्ध वकिल असून वसमत येथेच वकिली करतात. प्रकाश कात्नेश्वरकर यांच्या पत्नीही श्रीमती प्रभा कात्नेश्वरकर याही वकिल आहेत. यांचा मुलगा ॲड. शैलेश प्रकाश कात्नेश्वरकर हे औरंगाबाद येथे वकिली करतात. त्यांचा मुलगा देवेश

बंगरूळु येथे झालेल्या राष्ट्रीय जिम्नॅस्टिक स्पर्धेत सुवर्ण पदक मिळविल्या मुळे देवेश याची चंदीगड येथील पात्रता चाचणी साठी निवड झाली होती. तेथील त्याच्या उत्कृष्ट कामगिरी मुळे देवेश शैलेश कात्नेश्वरकर याची भारतीय संघात निवड झाली आहे. बॅकॉक येथे होऊ घातलेल्या जागतिक एशियान स्पर्धेत देवेश आता भारताचे प्रतिनिधित्व करणार आहे. माझे कात्नेश्वरकर घराण्याचे अतिशय घरेलु आणि जिव्हाळ्याचे संबंध आहेत. ॲड. प्रकाश कात्नेश्वरकर आमचे जिवलग मित्र होते. शैलेश कात्नेश्वरकर आमचा पुतण्या. सर्व कात्नेश्वरकर तरुण पिढी विधीज्ञ असून यशस्वी आणि व्यस्त वकील आहेत. देवेशचे महागावकर परिवार व आधुनिक केसरी महाराष्ट्र तर्फे हार्दिक अभिनंदन आणि देशासाठी पदक मिळवून दैदिप्यमान यशा साठी मनःपूर्वक कोटी कोटी शुभेच्छा

## शिवराई येथील शेतकरी यांना न्याय दया अन्यथा रस्त्यावर उतरू : उदय गवळी

आधुनिक केसरी न्यूज

**कन्नड :** शिवराई येथे गट 49 चे मालक रामभाऊ अंबादास नांगरे यांच्या शेतात कपाशीवर बोगस औषधांची फवारणी केल्यामुळे कपाशी जळुन खाक झाली त्याची तक्रार काल दिनांक 20/7/2022 रोजी जनशक्ती शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष अनिल पाटील शेळके यांच्या आदेशानुसार उपजिल्हाप्रमुख उदय भाऊ गवळी उपतालुकाप्रमुख सचिन शेजुवळ युवा उपतालुकाप्रमुख समाधान आहेर शेतकरी रामभाऊ अंबादास नांगरे यांनी कन्नड तालुका कृषीआधिकारी बळराजे मुळीक यांच्या कडे तक्रार केली कृषिअधिकारी यांनी तक्रारीची दखल घेऊन दिनांक 21/7/2022 रोजी दुपारी दोन वाजता स्थळ पंचनामा करून पुढील स्वॅप पावर तणनाशक कंपनी व नवं अंकुर कुषीसेवा केद्र दुकानदार यांच्यावर कार्यवाही करण्यात येईल असे कृषीअधीकारी बळराजे मुळीक यानी सांगितले होते मात्र त्यात आता पर्यत काय झाले कळालेच नाही म्हणुनच शिवराई येथील शेतकरी यांना योग्य तो न्याय दयावा अन्यथा रस्त्यावर उतरू असा इशारा गवळी यांनी दिला आहे.

यावेळी जनशक्ती शेतकरी संघटनेचे उपजिल्हाप्रमुख उदय गवळी तालुका संघटक गोविंद महाराज निकम उपतालुकाप्रमुख सचिन शेजुवळ युवा उपतालुकाप्रमुख समाधान आहेर महिला आघाडी तालुका संघटक शिलाताई नांगरे व ईत्यादी गावकरी उपस्थित होते.

**आम्ही शिवराई येथे शेतकरीयांच्या शेतात जाऊन आलो असुन सदरील स्थळ पंचनामा करून पुढील स्वॅप पावर तणनाशक कंपनीचे औषधी या तपासनी साठी पाठवले आहे त्यात दोषी आढळल्यास कुषीसेवा केद्र व दुकानदार यांच्यावर कार्यवाही करण्यात येईल.**

**बाळराजे मुळीक, कृषी अधिकारी**

काही गुप्त गोष्टी कुणाला सांगता येत नाहीत

(रविवारी मोफत तपासणी)

नस कमजोरी, शिघ्रपतन, शुक्रजंतू कमी, वांझपणा असल्यास भेटा..!

(33 वर्षात 1 लाख 60 हजार रूग्णांना मार्गदर्शन व उपचार केल्याचा अनुभवासह 150 पुरस्कारानी सन्मानीत)



डॉ. शेख ए.एच.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

## सुखी जीवनाचा मंत्र





डॉ. विजय दहिफळे

### पुरुषांमधील लैंगिक दोष...

आधुनिक केसरी

**फायमोसिस :** पुरुषांमध्ये प्रामुख्यानं आढळणारा दोष म्हणजे फायमोसिस. यामध्ये पुरुषांच्या अवयवांची त्वचा पूर्णपणे मागे न जाणे, त्वचा मागे जाताना खूप त्रास होणे, त्वचेला तडे जाऊन जखमा होणे, तेथे रक्तस्त्राव होणे अशी विविध लक्षणे आढळतात.

**पॅराफायमोसिस :** पुरुषांमध्ये आणखी एक दोष आढळून येतो ज्याला पॅराफायमोसिस असं म्हणतात. या दोषामध्ये पुरूषांच्या अवयवावर असणारी त्वचा आजारांमुळे किंवा वारंवार मागे जाऊन त्वचेला सूज येते त्यालाच पॅराफायमोसिस असे म्हटले जाते.

**पेरॉनिज प्लेक :** काही कारणांमुळे पुरुषांच्या अवयवांमध्ये गाठी निर्माण होतात आणि त्याला वाकडेपणा येतो. अवयवाला कठोरता आली की वेदना होतात. वैद्यकीय परिभाषेमध्ये यालाच पेरॉनिज प्लेक असं म्हटलं जातं, या दोषावर स्टेम सेल थेरपी, पेनाईल लिथोट्रिप्सी यासारखे अत्याधुनिक उपचार उपलब्ध आहेत. आता यातील काही दोष असे आहेत जे लहानपणापासून आढळतात किंवा लहान बाळांमध्ये आढळतात, आता आपण ते पाहूया.

**हायपोस्पॅडिअस :** या दोषामध्ये रुग्णाचे जन्मतःच लघवीचे छिद्र अवयवाच्या खालच्या बाजूला असणे, ते आकाराने लहान असणे आणि त्यामुळे लघवीची धार पायावरच पडणे अशी लक्षणे दिसून येतात. या रुग्णांच्या लिंगामध्ये वाकडेपणासुद्धा आढळतो. जर या रुग्णांच्या अवयवाची लहानपणीच शस्त्रक्रिया केली गेली नाही तर या रुग्णांना मोठेपणी शारीरिक क्रिया आणि वीर्यपतनासंबंधीच्या समस्या उद्‌भवतात. त्यामुळे योग्य डॉक्टरांच्या सल्ल्याने वयाची दोन वर्षे पूर्ण झाली की अशा रुग्णावर शस्त्रक्रिया करून घेणे फायदेशीर ठरते.

**अनडिसेंडेड टेस्टीज :** बऱ्याचदा लहान मुलांचे एक किंवा दोन्ही टेस्टिकल्स लिंगाच्या खालच्या बाजूस असलेल्या पोती किंवा पिशवीत (स्क्रोटम) मधे आलेले नसतात. नऊ महिन्यांपर्यंत ते खाली आले नाहीत तर शस्त्रक्रीया करणे हाच त्यावरील उपाय असतो. टेस्टिकल पोटातच राहिली तर त्याचा परिणाम शुक्राणूंवर होतो. तसेच कॅन्सरचा धोकाही उदभवू शकतो. **(क्रमशः)**

संपर्क : डॉ. दहिफळे युरॉलॉजी ॲण्ड प्लास्टीक सर्जरी हॉस्पीटल, जिल्हा न्यायालयासमोर, अदालत रोड, बाबा पेट्रोल पंपाजवळ, औरंगाबाद, मोबा. : 9822326248, फोन 0240-2364858
Email : drvijaydahiphale@gmail.com,
Website : www.dahiphalecosmeticurology.com